व्यवसाय / धंधा

अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

मो: ९४२२६५११०१

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...

दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...

व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..

(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र

फोन: 9552619752

कॉल / व्हॉटस्अॅप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...

501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २८० वा | शुक्रवार, दि. २० जून २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

काहींना राजकारणात पोरं होत नाहीत. मग ते इतरांची पोरं कडेवर घेतात - उद्धव ठाकरे

मुंबई (कटूसत्य वृत्त):- शिवसेना फोडली, वडील चोरले, पक्ष-चिन्ह चोरलं तरीही शिवसेना अद्याप संपत का नाही, असा प्रश्न आज या वर्धापन दिनाच्या सोहळ्याला झालेली गर्दी पाहून अनेकांना पडला असेल. ही गर्दी भाड्यानं आणलेली नाही. बाळासाहेब ठाकरेंनी रक्त आटवून उभं केलेलं हे वादळ आहे, अशा शब्दांत उद्धव ठाकरेंनी त्यांच्या भाषणाच्या सुरुवातीलाच शिवसेनेत अभूतपूर्व बंड करणाऱ्या एकनाथ शिंदेंना लक्ष्य केलं. आजची इथली गर्दी पाहून अनेकांचे नॅपकिनसह सगळे कपडे ओले होतील, असा टोला ठाकरेंनी लगावला. षण्मुखानंद हॉलमध्ये आयोजित सोहळ्यात बोलत होते.

शिवसेना आज ५९ वर्षांची झाली. पण शिवसेना कायम तरुण होती, आहे आणि ती तशीच कायम राहील, असं उद्धव ठाकरे म्हणाले. शिवसेनेच्या स्थापनेचा मेळावा शिवतीर्थावर झाला होता. त्यावेळी अनेकांनी इतक्या मोठ्या मैदानात सभा घेऊ नका. तितकी गर्दी जमणार नाही, मग नामुष्की ओढावेल, असा सल्ला अनेकांनी दिला होता. पण बाळासाहेबांनी शिवतीर्थावर सभा घेण्याचं धाडस दाखवलं, असा किस्सा उद्धव यांनी सांगितला.

'बाळासाहेबांनी शिवसेनेची स्थापना केली. शिवतीर्थावर त्यांची पहिली सभा झाली. त्यावेळी मी स्टेजच्या खाली माँच्या मांडीवर बसलो होतो. आता दाढी खाजवत फिरणारे तेव्हा नेमके कुठे होते,' असा प्रश्न उद्धव यांनी उपमुख्यमंत्री शिंदेंचं नाव न घेता विचारला. तेव्हा खालून एका शिवसैनिक महिलेनं रिक्षा चालवत होते असं म्हणत उत्तर दिलं. त्यावर उद्धव ठाकरे हसले. काहींना राजकारणात पोरं होत नाहीत. मग ते इतरांची पोरं कडेवर घेतात, असा सणसणीत टोला उद्धव यांनी लगावला.

भाजपच्या निष्ठावंतांची मला दया येते. किती काळ तुम्ही फक्त सतरंज्याच उचलणार? आता तर तुम्ही पार सतरंजीची खाली गेलात. तिथून बाहेर या आणि तुमच्या नेतृत्त्वाला तुमची छाती किती इंचाची आहे ते एकदा दाखवून द्या, अशा शब्दांत शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे भाजपवर बरसले. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या एका फोटोचा दाखला दिला. त्या फोटोत फडणवीस मधोमध बसलेले होते आणि त्यांच्या आसपास अशोक चव्हाण, अजित पवार, छगन भुजबळ अशी नेतेमंडळी होती.

विधानसभा निवडणुकीत मतदारांनीच तुमचा मुडदा पाडला - एकनाथ शिंदे

मुंबई (कटूसत्य वृत्त):- विधानसभा निवडणुकीतील कामगिरीची आकडेवारी सांगत उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांनी शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर दिलं. कम ऑन किल मी असं म्हणत आव्हान देणाऱ्या ठाकरेंना मरे हुए क्या मारना असा सवाल करत शिंदेंनी विचारला. विधानसभा निवडणुकीत मतदारांनीच तुमचा मुदडा पाडला, असा खोचक टोला शिंदेंनी लगावला. मुंबईतील वरळी डोममध्ये आयोजित शिवसेनेच्या वर्धापन दिन सोहळ्यात ते बोलत होते.

उद्धव ठाकरेंच्या नेतृत्त्वात एकसंध शिवसेना २०१४ आणि २०१९ मध्ये विधानसभा निवडणूक लढली. त्यानंतर २०२४ मध्ये ठाकरेंच्या नेतृत्त्वात, शिवसेनेत फूट पडल्यानंतर पक्षानं निवडणूक लढवली. याची आकडेवारी शिंदे यांनी मांडली आणि ठाकरेंवर शरसंधान साधलं. याचवेळी त्यांनी आपल्या पक्षाचा स्ट्राईक रेट आणि आकडेवारी सांगत आमचीच शिवसेना खरी असा दावा केला.

'आणि म्हणून मी तुम्हाला थोडं गणित सांगतो. विधानसभेच्या गेल्या तीन निवडणुकांमध्ये काय झालं ते आपल्याला माहीत आहे. २०१४ मध्ये सेनेने २८२ जागा लढवल्या आणि ६३ जागा जिंकल्या. त्यावेळी स्ट्राईक रेट होता फक्त २२ टक्के. २०१९ साली शिवसेनेनं १२४ जागा लढवल्या आणि ५६ जागा जिंकल्या. त्यावेळी स्ट्राईक रेट होता ४५ टक्के,' अशी आकडेवारी शिंदेंनी मांडली.

'२०२४ रोजी आपल्या, तुमच्या शिवसेनेनं ८० जागा लढवल्या आणि तब्बल ६० जागा जिंकल्या. त्याचवेळी उबाठानं ८५ जागा लढवल्या आणि अवघ्या २० जागा जिंकल्या. म्हणजे त्यांचा स्ट्राईक रेट केवळ २३ टक्के. म्हणजे आपल्या शिवसेनेच्या वन थर्ड मतंही त्यांना मिळाली नाहीत. कारण विधानसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेनं त्यांना जोरदार थर्ड दिला. त्यामुळे वन थर्डही मतं मिळाली नाहीत,' असा टोला शिंदेंनी लगावला.

उबाठानं ज्या जागा जिंकल्या त्या काँग्रेसच्या मतपेटीवर, काँग्रेसच्या मेहेरबानीवर जिंकल्या. कारण शिवसेनेच्या मतदारांनी उबाठाला केव्हाच टाटा, बाय बाय केलेलं आहे. २०२४ च्या निवडणुकीत जनतेनं त्यांची बिनपाण्यानं हजामत करुन टाकली आहे. त्यांची वाटचाल विनाशाकडे सुरु आहे. अहंकारी लोकांचा फणा जनतेनंच ठेचला आहे. बाळासाहेबांनी काँग्रेसला आयुष्यभर विरोध केला. त्याच काँग्रेसच्या दावणीला शिवसेनेला बांधण्याचं पाप कोणी केलं ते आपल्याला माहीत आहे. सत्तेसाठी कोण लाचार झालं ते आपल्याला माहीत आहे,' अशा शब्दांत शिंदे ठाकरेंवर बरसले.

विमानसेवेमुळे मिळणार जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला चालना

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूरकरांसाठी विमानसेवा सूरू होण्याचा दीवस ऐतिहासिक ठरला. येथील विमानतळावरून सोलापूर-गोवा विमानसेवा सुरू झाली आहे. त्यामुळे सोलापूर जिल्हा हा देशाच्या हवाई क्षेत्राशी जोडला गेला. यातून सोलापूर जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळेल. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात सोलापूर ते मुंबई ही विमानसेवा सुरू केली जाणार असल्याची ग्वाही केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

सन 2014 च्या आधी देशात 74 विमानतळ होते. गेल्या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने 162 विमानतळ विकसित केले आहे, असे मंत्री मोहोळ यांनी सांगितले.

विमानसेवा सोलापूरच्या उद्योग, व्यवसाय व पर्यटन वाढीसाठी महत्त्वपूर्ण आहे. पहिल्या टप्प्यात सोलापुरातून गोव्यासाठी सेवा सुरू होत आहे. गोव्यातून देश व विदेशात सर्व ठिकाणी विमानाने प्रवास करणे शक्य होणार आहे. आता सोलापुरातून मुंबईसाठी विमान सेवा सुरू करण्याची गरज आहे.

सोलापूर विमानतळावर वातावरण स्पष्टतेबाबत तांत्रिक अडचणी उद्भवणार नाही यासाठी डीवॉल सिस्टीम बसवणे तसेच नाईट लँडिंगची सुविधा उपलब्ध करणे या अनुषंगाने पुढील काळात काम केले जाणार असल्याचे मोहोळ यांनी सांगितले.

ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात सोलापूरहून मुंबईसाठी विमानसेवा सुरू होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नातून गोव्यासाठी विमानसेवा सुरू झाली आहे. सोलापूर विमानतळावरून आता केंद्र शासनाच्या उडान योजनेंतर्गत तिरुपती, हैदराबाद व बंगळूरसाठीही विमानसेवा लवकरच सुरू केली जाणार असल्याची घोषणाही यावेळी मोहोळ यांनी केली.

सोलापूर विमानतळावरून लवकरच मुंबईसाठी सेवा सुरू करण्यात येणार असल्याचे मंत्र्यांनी भाषणात सांगितले. तरी विमानतळ परिसरात आगामी विमानसेवेविषयी फ्लेक्स उभारण्यात आले होते. मुंबईसाठी लवकरच सोलापुरातून विमानसेवा सुरू होणार, या मजकुरासह त्यावर स्टार एअर लाईन्सचाही उल्लेख होता. त्यामुळे लवकरच सोलापुरातून सुरू होणारी मुंबई विमानसेवा ही स्टार लाईन्सची असणार असल्याचे स्पष्ट झाले. सोलापूरातून विमानसेवा सुरू झाल्याने औद्योगीक विकास वेगात होणे अपेक्षीत आहे. जिल्ह्यातील कृषी क्षेत्रालाही याचा फायदा होईल. याबरोबरच बहुराष्ट्रीय कंपन्या शहरात येण्याच्या दृष्टीने पायाभूत सुविधा निर्माण झाल्याने आता जिल्ह्यातील नेतृत्वाने औद्योगीक आघाडीवर प्रयत्न करणे गरजेचे आहे. याआधी विमानसेवा सुरू झाली पण काही दीवसांपुरतीच आता तसे न होता ही विमानसेवा कायमस्वरूपी चालण्यासाठी सर्व घटकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. सोलापूरातील गारमेन्ट व्यवसायाला या विमानसेवेचा फायदा होईल याबरोबरच नवे उद्योग शहरात येण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. याबरोबरच बोरामणी आंतरराष्ट्रीय विमानतळालाही गती देण्याची गरज असून भाजप शासनाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे. राजकारण बाजूला ठेऊन शहर जिल्ह्याच्या विकासासाठी एकत्रीत प्रयत्नांची गरज आहे.

हरित मार्गावरील झाडांची कत्तल; पंढरपूर-मंगळवेढा रस्त्यावरील वडाची झाडे तोडली

मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):- ऑक्सिजन मार्ग म्हणून नावारूपाला येत असलेल्या मंगळवेढा-पंढरपूर हरित पालखी महामार्गावरील बाजार समितीसमोरील बसथांब्याजवळील पन्नास फूट उंचीची दोन वडाची झाडे शुक्रवारी रात्री अज्ञातांकडून तोडण्यात आली.

ऐन वारी काळात अशा प्रकारे झाडांची कत्तल केल्यामुळे पर्यावरणप्रेमींकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. याचा घडा लावून दोषींना कडक शासन करण्याची मागणी वारी परिवाराच्या वतीने करण्यात आली आहे.

३३ कोटी वृक्षलागवड मोहिमेअंतर्गत पंढरपूरची वारी हरितवारी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ह.भ.प. शिवाजी मोरे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती व वारी परिवार यांच्या सहकार्यातून वृक्षलागवड करण्यात आली. जनावरांपासून रक्षण करण्यासाठी जाळी बसविण्यात आली. झाडे लहान असताना उन्हाळ्यात वारी परिवाराने टँकरद्वारे पाणी घालून झाडांचे जतन केले.

वृक्ष लागवडीत लोकांचा सहभाग वाढावा म्हणून दरवर्षी या झाडांचा वाढदिवस साजरा करण्याची संकल्पना देखील त्यांनी चालवली. सध्या झाडांची झालेली वाढ पाहता अनेक पर्यावरणप्रेमी नागरिकांनी मंगळवेढा पंढरपूर मार्ग वडाच्या झाडामुळे ऑक्सिजन मार्ग म्हणून नावारूपाला येईल असा विश्वास देखील व्यक्त केला. मात्र शुक्रवारी झाडे तोडून पंढरपूर रोडवरील औद्योगिक वसाहतीत टाकत विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केला. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर वारी परिवाराच्या वतीने ही पाहणी करून संबंधित विभागाला माहिती दिली. वृक्षतोड करणाऱ्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी वृक्षप्रेमींच्या वतीने मागणी करण्यात आली आहे.

विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती व वारी परिवार यांच्या वतीने पंढरपूरची वारी हरित वारी होण्यासाठी पालखी महामार्गावर वृक्ष लागवड केली होती. वृक्षतोड करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी.

- सुहास पवार,
उपसरपंच, संत चोखामेळानगर

अरण्यऋषी पद्मश्री मारुती चित्तमपल्ली यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- पद्मश्री अरण्यऋषी श्री मारुतीराव भुजंगराव चित्तमपल्ली यांचे 18 जून 2025 रोजी सायं 7.50 वाजता वयाच्या 94 व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले होते. आज अक्कलकोट रोडवरील सूत मिल हेरिटेज मनिधारी एम्पायर सोसायटी येथील निवासस्थानापासून त्यांची अंत्ययात्रा निघाली. त्यांच्यावर रूपा भवानी मंदिराजवळील हिंदू स्मशान भूमी येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पोलीस विभागाच्या वतीने बंदुकीच्या तीन फैरी हवेत झाडून श्री चित्तमपल्ली यांना मानवंदना देण्यात आली.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पद्मश्री मारुती चित्तमपल्ली यांच्या पार्थिवावर पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस आयुक्त एम. राजकुमार व उपस्थित लोकप्रतिनिधी यांनी श्री चित्तमपल्ली यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र वाहिले व दर्शन घेतले.

यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सामाजिक वनीकरण चे अजित शिंदे, मनीषा पाटील यांच्यासह अन्य मान्यवर तसेच त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक, साहित्यिक, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या

सेक्स समस्या

हस्तमैथुनाचे दुष्परिणाम | स्वप्नदोष | धातुपात | शीघ्रपतन | अकालवीर्यपात | कमकुवत | शुक्राणुंची कमी | नुपुंसक | लवकरच | नपुंसकत्व | मानसिक नैराश्य

जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन

डॉ.अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)

B.H.M.S.,M.D (A.M) , M.D (Acu).,P. G (Sexology)

२९ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)

अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार (प्रत्येक नवीन रुग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) अॅपॉईंटमेंट आवश्यक.

१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार

सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक

विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर

www.sextreatment.in

94 22 23 90 13

महिनाभरात पाणी रोटेशन एक दिवसाने कमी होणार

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- अर्धा तास पाणीपुरवठ्याची वेळ कमी करून येत्या महिनाभरात शहराचा पाणीपुरवठा एका दिवसाने कमी करण्याचे नियोजन महापालिकेकडून सुरू आहे. ज्या भागात पाच दिवसाआड पाणीपुरवठा आहे त्या ठिकाणी चार दिवसाआड आणि ज्या ठिकाणी चार दिवसाआड पाणीपुरवठा आहे त्या ठिकाणी तीन दिवसाआड पाणीपुरवठा होणार आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर शहराला लवकरच तीन दिवसाआड पाणीपुरवठा शक्य होणार असल्याचे सांगितले होते. त्यादृष्टीने महापालिकेने निर्णय घेतला आहे. उजनी-सोलापूर दुहेरी जल-वाहिनीची चाचणी प्रक्रिया सुरू आहे. सोरेगाव जल शुद्धीकरण केंद्र येथे दोन दिवसांपूर्वी पाणी पोहोचले आहे.

सोलापूर शहराला सध्या पाच ते सहा दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. सध्या पाण्याच्या दिवशी साडेतीन तास पाणीपुरवठा केला जातो. महिनाभरात याचे नियोजन बदलण्यात येईल. साडेतीन तास ऐवजी तीन तास पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. अशा पद्धतीने शहराचा एक दिवसाने पाणीपुरवठा कमी करण्यात येणार आहे.

सायं दैनिक सोलापूर www.katusatya.in **कटूसत्य** मुख्य कार्यालय संपादक पांडूरंग हरिदास सुरवसे उपसंपादक सचिन मोहन जाधव सोलापूर वृत्तदर्पण न्यूज चॅनल

पत्ता :- वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर, फोन : ०२१७-२६०५०९१, ०२१७३५५०५९२, मो. ९६५७०६९०६९, मो.९७६५३९०३३९

आपणही होवू शकता ''मुक्त पत्रकार''

नमस्कार....,

आपणही ''मुक्त पत्रकार'' होवून समाजात मानसन्मान व प्रामाणिकपणे काम करुन प्रामणिक पैसे कमवू शकता. शेतकरी, व्यवसायिक, निमशासकीय कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार, डॉक्टर, वकील, इंजिनियर, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल, आजी माजी संरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक यासह समाजाचे हित जोपासणारा कोणताही सुजाण नागरिक ''मुक्त पत्रकार'' होवू शकतो.

या संधीचा लाभ घेण्यासाठी आपण १०००/- रूपये भरून वार्षिक वर्गणीदार (सभासद) होणे आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी भरणाऱ्यास १०००/- रूपये किंमतीची पुस्तके भेट देऊन वर्षभर अंक घरपोच पाठविला जाणार आहे. तसेच आपली किंवा आपण द्याल ती (२ कॉलम ५ सेंमी) इतकी जाहिरात वर्षातून एकदाच दैनिक ''कटूसत्य'' या वृत्तपत्रात अगदी मोफत प्रसिद्ध केली जाईल.

मग चला तर ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर 'फोन पे', 'गूगल पे' करून, दैनिक सोलापूर कटूसत्य या नावानी चेक/डी.डी.किंवा Daily Solapur Katusatya, Lokmangal Co-Op Bank LTD., Solapur, AC:- 0020011120001265, IFSC:- IBKL0478LOK या खात्यावर आपली रक्कम ऑनलाईनद्वारे जमा करून वर्गणीदार व्हा. आणि ''मुक्त पत्रकार'' होण्याची नामी संधी मिळवा. आपण रक्कम जमा केल्यानंतर तात्काळ ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर कळवा. आणि रक्कम पाठविल्याचा स्क्रीनशॉट, पावती, आपल्या संपूर्ण माहितीसह अर्ज, फोटो, शैक्षणिक पात्रता, भारतीय असल्याचा पुरावा आणि subject मध्ये 'मुक्त पत्रकार' असे लिहून katusatyajob@gmail.com या मेलवर पाठवा. म्हणजे या योजनेच्या सर्व सुविधा आपणास देणे आम्हांला सोपे होईल.

नियम व अटी:- १) आपण आपली संपूर्ण माहिती पाठविल्यानंतर दोन दिवसात आपल्या मोबाईलवर डिजिटल मध्ये ''मुक्त पत्रकार'' म्हणून ओळखपत्र पाठविले जाईल. २) ''मुक्त पत्रकार'' मुळ ओळखपत्र व पुस्तके पाठविण्याचा पोस्टल व इतर खर्च २००/- रूपये आपणास द्यावे लागतील. (कार्यालयात येवून हे सर्व साहित्य घेऊन गेल्यास पोस्टल खर्च घेतला जाणार नाही.) ३) सहा महिन्या नंतर ''मुक्त पत्रकार'' म्हणून 'प्रमाणपत्र' दिले जाईल. ४) आपण सर्व प्रकारच्या बातम्या पाठवू शकता. मात्र बातमी लावण्याचे व मानधन देण्याचे सर्व अधिकार दैनिक 'कटूसत्य' व 'वृत्तदर्पण' न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले जातील. ५) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही गावातील, शहरातील किंवा महानगरातील व्यक्ती ''मुक्त पत्रकार'' म्हणून काम करू शकतो. ६) आपल्या वृत्तपत्र व न्यूज चॅनलच्या विविध योजणेंसाठी जाहीराती संकलन केल्या जातात. आपण स्वतः संकलन केलेल्या जाहीरतीच्या (जमा केलेल्या) रक्कमेवरच आपल्याला कमिशन दिले जाईल. ७) या योजनेत सहभागी होवून कमिशनच्या स्वरूपात पैसे कमावण्याची संधी आहे. ८) आमचे ''मुक्त पत्रकार'' झाल्यानंतरच आपल्या जाहीराती स्वीकारल्या जातील व आपण पाठविलेल्या जाहिरातीवरच २०% ते ४०% कमिशन दिले जाईल. ९) कोणत्याही जाहिरातची संपूर्ण रक्कम जमा केल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध किंवा प्रसारीत केली जाणार नाही. १०) सदर योजनेचे नियम बदलणे किंवा रद्द करणे या बाबतचे सर्व अधिकार दैनिक कटूसत्य व वृत्तदर्पण न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले आहेत. ११) मग...! चला तर, आजच ''मुक्त पत्रकार'' होवूया..!! आणि कमिशनच्या स्वरूपातून पैसे कमविण्यास सुरूवात करुया...!!!

जे जे चांगले ते ते अंगिकारुया
करी होऊन पणती ! एक सुर्य निर्मूया
अंधार पळवूनी बेकारीचे ! नवे आव्हान पेलूया
हाताला काम, कामाला दाम - चला गाळूया घाम

आपला विश्वासू
सपादक दै.सां.कटूसत्य

टिप:- ''कटूसत्य'' व ''वृत्तदर्पण'' या समुहात आपले स्वागत. आपण आणखीन काहीजणांना आपल्या समुहात सामील कराल अशी अपेक्षा.

संपादकीय

कृषी क्षेत्रात 'एआय'

सध्या जगभरात सर्वत्र सर्वच क्षेत्रांत बोलबाला असलेल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता या तंत्रज्ञानाचा वापर महाराष्ट्रात शेती क्षेत्रात करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळ बैठकीमध्ये एक धोरण ठरवण्यात आले. अनेक दिवसांपासून राज्याचे प्रतिनिधित्व करणारे अनेक मंत्री आणि आमदार सातत्याने कृषी क्षेत्रात 'एआय'चा वापर करण्याबाबत विचार सुरू असल्याच्या घोषणा करत होते. आता सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीतच कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यासाठी एक धोरण निश्चित केले असून त्याचा फायदा राज्यातील शेतकऱ्यांना होईल अशी आशाही व्यक्त केली आहे. जागतिक पातळीवर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ज्या विविध गोष्टी सुरू आहेत त्याचा वापर भारतात किंवा महाराष्ट्रात करणे हे समजण्यासारखे असले, तरी अर्थव्यवस्थेतील प्रमुख क्षेत्र असलेल्या शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून या क्षेत्राला संजीवनी देण्याचे काम होऊ शकते का, याचा विचार करावा लागेल.

गेल्या काही वर्षांमध्ये जगातील अनेक देशांनी कृषी क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करायला सुरुवात केली आहे. सर्वसाधारणपणे शेती क्षेत्राला ज्या समस्या जाणवतात त्या समस्यांना उत्तर मिळावे यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर जगात इतरत्र केला जात आहे. त्याच पद्धतीने महाराष्ट्रातही हे तंत्रज्ञान वापरण्यात आले तर देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये प्रथम क्रमांक असलेल्या महाराष्ट्रात बळीराजाला दिलासा देण्याचे काम होऊ शकते. मुळात संपूर्ण भारताप्रमाणे महाराष्ट्रातीलही बहुतांशी शेती पावसावर अवलंबून आहे. हवामानाचा अचूक अंदाज जर मिळाला नाही आणि कधी पाऊसच पडला नाही किंवा कधी गरज नसताना मुसळधार पाऊस पडला तर शेतकऱ्याचे सर्व नियोजनच कोलमडून जाते.

जगात इतरत्र जेथे कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान वापरले जाते तेथे प्रामुख्याने शेतकऱ्यांना हवामानाचा आणि पावसाचा अचूक अंदाज मिळावा याला प्राधान्य दिले जाते. साहजिकच महाराष्ट्रातही तंत्रज्ञान वापरताना हवामानाचा शेतीवर प्रतिकूल परिणाम होणार नाही यासाठी या तंत्रज्ञानाचा अचूक वापर होणे गरजेचे आहे. ऋतुचक्र सातत्याने बदलत असल्याने दरवर्षी पाऊस आपली सरासरी पूर्ण करत असला तरी जेव्हा हवा तेव्हा तो पडत नाही आणि जेव्हा त्याची गरज नसते तेव्हा तो प्रचंड प्रमाणात पडतो असाच गेल्या काही वर्षांचा इतिहास आहे. याच पार्श्वभूमीवर शेतीला आवश्यक असलेल्या हवामानाच्या विषयामध्येच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याची गरज आहे.

याव्यतिरिक्त गेल्या काही वर्षांपासून नागरीकरणाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने ग्रामीण भागातील कामकरी लोक मोठ्या प्रमाणात शहराकडे स्थलांतरित होत आहेत. साहजिकच शेतीवर काम करणाऱ्या लोकांची संख्या कमी होत आहे. शेतमजूर मिळत नाहीत. जास्त मजुरी देऊन शेतीची कामे करून घ्यावी लागतात. दक्षिण आफ्रिकेच्या काही भागांमध्ये ज्या ठिकाणी शेती क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात आला तेथे प्रामुख्याने जी मनुष्यबळाची टंचाई जाणवते. त्याच्यावर उपाययोजना करण्यासाठी हे तंत्रज्ञान वापरण्यात आले. साहजिकच महाराष्ट्रातही अशाच प्रकारे हे तंत्रज्ञान वापरणे शक्य आहे.

अर्थात, या सर्व गोष्टी होत असतानाच शेती फायदेशीर कशी होईल हे पाहण्यासाठीसुद्धा ही कृत्रिम बुद्धिमत्ता वापरता येईल का, हेही पाहावे लागेल. महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेतमालाला जर योग्य भाव मिळाला तर शेती फायदेशीर होऊ शकते. खतांच्या आणि बियाण्यांच्या वाढत्या किमती, पाणीपुरवठ्याची अनियमितता यामुळे शेतकऱ्याचा उत्पादनखर्च कधीच समान राहात नाही. दरवर्षी तो बदलत राहतो. त्यामुळे ठरावीक पद्धतीने त्याच्या शेतमालाला किंमत देणे शक्य होत नाही. मधल्या मध्ये दलाल मात्र पडत्या किमतीला शेतमाल खरेदी करून स्वतःचे उखळ पांढरे करतात; पण शेतकऱ्याच्या हातात काहीच राहात नाही.

सरकारच्या कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणामध्ये विविध गोष्टींचा समावेश असला, तरी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची शेती किफायतशीर आणि फायदेशीर कशी होईल, या गोष्टीला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागणार आहे. शेतकऱ्याची शेती फायदेशीर होत नसल्यामुळेच त्याचा कर्जबाजारीपणा वाढत जातो आणि यातून आत्महत्यांचे प्रमाणही वाढत जाते ही साखळी जर तोडायची असेल, तर कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्याला त्याच्या शेतीतून चांगला नफा मिळायला हवा. येत्या काही दिवसांमध्ये महाराष्ट्र सरकारच्या या कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणाचे विविध तपशील समोर येतीलच.

गेल्या काही वर्षांमध्ये हे तंत्रज्ञान समोर आल्यापासून अनेक क्षेत्रांमध्ये त्याचा फायदाच दिसून आला आहे. तसाच फायदा शेती क्षेत्रामध्येही दिसून आला, तर त्याचे स्वागतच करावे लागेल. अर्थात, काहीतरी नवीन करायच्या ईर्ष्येतून नाही तर शेतकऱ्यांना फायदा होईल या र्खया अपेक्षेतून अशा प्रकारचा निर्णय सरकारने घेतला असेल, तर त्या निर्णयाची अंमलबजावणीसुद्धा तेवढ्याच खरेपणाने आणि गंभीरपणे करण्याची जबाबदारी महाराष्ट्र सरकारला घ्यावी लागणार आहे. इतर क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेकडे एक आव्हान म्हणून पाहिले जात असताना, शेती क्षेत्रासाठी ते वरदान ठरू शकेल हे या निमित्ताने महाराष्ट्र सरकारला सिद्ध करावे लागेल.

श्रीमंताचीच मुले व्यसनी निघतात... बापाची कमाई पाण्यात घालतात...

आजकाल व्यसनाचे प्रमाण खूप वाढले आहे. विशेष करून श्रीमंत बापाच्या श्रीमंत औलादी व्यसन करण्यात फार पुढे गेल्या आहेत. ढाब्यावर किंवा बारवर गेल्यास असे निदर्शनास येते की, तिथे गरीब घरातील पिणारे युवक कमी प्रमाणात आणि श्रीमंत घरातील पिणारे युवक अधिक प्रमाणात पाहायला मिळतात. संध्याकाळ झाली की, गावातील पिणारे युवक एकत्र येतात आणि ढाब्यावर जाऊन मनसोक्त पार्टी करतात. हजारो रुपये दारू व मटक्यावर उधळतात. स्वतःच्या मर्जीप्रमाणे चैन विलासात मनमानी व चंगळवादी जीवन जगतात. काही काही श्रीमंत बापाच्या श्रीमंत औलादी तर फार पुढच्या थराला गेलेल्या असतात. डान्स बारमध्ये जाऊन तरुण मुली किंवा बाया नाचवतात, आपणही फुल दारू पिऊन त्यांच्यासोबत डान्स करतात अन् हजारो रुपये त्या नाच्यांवर उधळतात. या युवकांचा असाच रोजचा दिनक्रम ठरलेला असतो. या युवकांच्या बापाने मात्र अतिशय चिकाटीने व स्वतःच्या पोटाला चिमटा देऊन आणि दुसऱ्यांना फसवून किंवा दुसऱ्यांचा पैसा लुबाडून अमाप पैसा व संपत्ती गोळा केलेली असते. आणि श्रीमंत म्हटले जाणारे हे लोक फार चिकाटीचे व कंजूष असतात. त्यांच्या हातातील पैसा सहजासहजी तर सुटतच नाही. ते नेहमी पैसा पैसा करतात.आणि पैशाच्या मागे सुसाट वेगाने धावतात. त्यांना दानधर्म करायला आवडत नाही. ते दारावर आलेल्या भिकाऱ्याला रिकाम्या हाताने परत करतात. अडचणीत सापडलेल्या नातेवाईकांना किंवा समाज बांधवांना आर्थिक मदत करायला त्यांना नको वाटते. मी काही असेही श्रीमंत माणसे पाहिले आहेत की, ते गटारात पडलेला एक रुपया हाताने काढून घेतात आणि खुशाल खिशात टाकतात. त्यांना कशाची लाज वाटत नाही ना कशाची लज्जा! खूप निसाक असतात हो हे श्रीमंत लोक आणि पैशाला तर खूपच हापापलेले असतात. त्यांच्या डोक्यात सारखे पैशाचे वेड असते. हे लोक मरायला टेकले तरी पैसा पैसा करायचे सोडत नाहीत. या श्रीमंतांना पैशाशिवाय दुसरे काही सुचतच नाही. या नादात आपली सामाजिक प्रतिष्ठा कमी होत आहे, याचे देखील त्यांना भान राहत नाही.हे यावरून स्पष्ट होते. या श्रीमंत लोकांना असे वाटत असते की, आपल्या मुलाने किंवा मुलीने लव्ह मॅरेज किंवा कोर्ट मॅरेज करावे म्हणजे लग्नाला खर्च होणारा पैसा वाचेल. म्हणजे या श्रीमंतांना ना कसली इज्जत ना कसली प्रतिष्ठा फक्त स्वतःचा स्वार्थ साधने हेच त्यांचे उद्दिष्ट. दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ही श्रीमंत माणसे शासकीय योजनांचा लाभ घेण्यात सगळ्यांच्या पुढे असतात. सरकारी दवाखान्यात सुद्धा गरिबांपेक्षा श्रीमंत माणसेच मोफत औषधोपचारांचा लाभ घेताना रांगेत दिसतात. या श्रीमंतांची गर्दी पाहून गरीब रुग्ण खाजगी दवाखान्यात उपचार घेण्यासाठी जातात. ही श्रीमंत माणसे जेवढा पैसा बचत करता येईल तेवढा बचत करण्याचा प्रयत्न करतात. मग अशा श्रीमंतांना समाजात व गावात कोण किंमत देईल. त्यांच्यात लोकांना दानधर्म करण्याची दानत नाही आणि गरजवंताला सढळ हाताने आर्थिक मदत करण्याची भावना नाही तर मग अशा माणसांच्या पैशाला व संपत्तीला काय जाळायचे आहे? यापेक्षा शेतात काबाडकष्ट करून पोट भरणारी माणसे यांच्यापेक्षा बरे म्हणावे लागतील. ते पैशापेक्षा माणुसकीला आणि माणसाला जास्त महत्त्व देतात. मानवता हाच धर्म पाळून गरजवंताला सढळ हाताने आर्थिक मदत करतात. दारावर आलेल्या भिकाऱ्याला दानधर्म करण्याची त्यांच्यात दानत असते. आपल्या मुलांचे लग्न धुमधडाक्यात लावून गाव जेवण देण्याची त्यांच्यात धमक असते. म्हणूनच त्यांच्या पोटाला चांगली व गुणवान संतती निर्माण होते. पण दुसऱ्यांची घरे उध्वस्त करून पैसा व संपत्ती मिळवणाऱ्या बापाच्या पोटाला संतती कशी काय चांगली निपजणार? त्यांच्या पोटाला तर संतती व्यसनी व दारुडीच निघणार आणि बापाने दुसऱ्यांना फसवून हडप केलेली संपत्ती ही मुले दारू आणि मटक्यावरच उधळणार! एवढे मात्र नक्की आहे.. ज्या मुलाचे आई वडील अहोरात्र काबाडकष्ट करून व शेतात घाम गाळून भरपूर पैसा व संपत्ती कमावतात त्या दांपत्याच्या पोटी मुले सुद्धा निर्व्यसनी व चांगली निघतात. बापाने कमावलेला पैसा चांगल्या कायासाठी लावतात. कारण निसगार्चा नियमच आहे की, ज्याने चांगल्या मार्गाने पैसा कमावला त्याची मुले चांगलीच निघतात आणि ज्याने वाईट मागार्ने व दुसऱ्यांना लुबाडून हरामीचा पैसा कमावला त्याच्या पोटाला मुले व्यसनी व दारुडे निघतात. आणि सगळा पैसा दारूवर आणि पोरीवर उधळतात. आपण समाजात पाहतोय की, ज्या बापाने दुसऱ्यांना फसवून वाईट मागार्ने पैसा कमावलेला असतो त्या बापाची मुले व्यसनी, दारुडे व उडवे निघतात आणि बापाने पापाने कमावलेला पैसा पाण्यात घालतात. पण जे आईवडील शेतात खूप खूप काबाडकष्ट करतात, जिवापाड मेहनत करतात त्या दांपत्याच्या पोटी खरोखरच गुणवान व शीलवान मुले जन्माला येतात. आपल्या आई वडिलांचा जीवन संघर्ष डोळ्यासमोर ठेवून खूप खूप अभ्यास करतात. आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवतात. आई-वडिलांनी पाठवलेला पैसा काटकसरीने वापरतात आणि हीच मुले भविष्यात उच्च पदावर विराजमान होतात. ही वस्तुस्थिती आहे. हल्ली जर समाजात, गावात व कुठेही पाहिले तर असे दिसून येईल की, प्रत्येक श्रीमंत बापाच्या पोटाला व्यसनी व दारुडे मुले आल्याचे समजते. त्यांनी दारू व मटक्यात बापाचा पैसा बरबाद करून करोडपती बापाला काही दिवसातच भिकारपती बनवल्याचे अनेक उदाहरणे आपण डोळ्यांनी पाहिले आहेत. हे सत्य कोणालाही नाकारता येणार नाही. या श्रीमंतांकडे जो पैसा असतो तो काय त्यांनी इमानदारीने व कष्टाने घाम गाळून थोडाच कमावलेला असतो. या श्रीमंतांनी कित्येक लोकांचा तळतळाट खाऊन आणि कित्येक लोकांची घरे उध्वस्त करून हा पैसा कमावलेला असतो. मग हा वाईट मागार्ने कमावलेला पैसा कसा काय टिकेल? जैसी करनी वैसी भरणी या म्हणी प्रमाणे दुसऱ्यांना लुबाडून कमावलेला पैसा हा कुठेतरी फेडावाच लागतो. म्हणून आपल्या पोटाला निसगार्ने मुद्दाम व्यसनी व दारुडे मुले पाठवून दिलेली असतात. बापाने वाईट मागार्ने कमावलेला पैसा व संपत्ती ही दारुडे मुले दारू व मटक्यावर उधळतात. बापाला मात्र एक दिवस कंगाल करून सोडतात. इतके दिवस यांनी लोकांची घरे उध्वस्त केलेली असतात आणि आता त्यांचाच मुलगा दारू व मटक्यात त्यांचे घर स्वतःच्या हाताने उध्वस्त करून टाकतो. यालाच म्हणतात जसे करावे तसे भरावे... आपण दुसऱ्यांचे चांगले केले तर आपले चांगले होते. म्हणतात ना कर भला सो हो भला... हे काय उगीच म्हटले नाही. म्हणून माझी सर्वांना कळकळीची नम्र विनंती आहे की, बांधवांनो कधीच दुसऱ्यांना लुबाडून किंवा फसवून पैसा मिळवू नका... दुसऱ्यांची घरे बरबाद करून मिळवलेला पैसा फार काळ टिकू शकत नाही. तो कसा संपून जाईल हे तुम्हाला पण कळणार नाही. तुम्ही असाल करोडपती पण तुम्हाला एक दिवस भिकारपती केल्याशिवाय राहणार नाही...म्हणून पैसा हा घाम गाळून कष्टाने व इमानदारीने कमवा... हरामीने कमावलेल्या लाख रुपयापेक्षा कष्टाने कमावलेले पन्नास हजारच आपल्याला खूप महत्त्वाचे आहेत... आपल्या मुलांना एवढी पण संपत्ती कमावून ठेवू नका की, मुले व्यसनी, आळशी व बिनकामी निघतील...फक्त एवढेच करा की, आपल्या मुलांना उच्चशिक्षण शिकण्याएवढा मुबलक पैसा साठवून ठेवा... शिल्लक पैसा अनाथाश्रमांना व वृद्धाश्रमांना दान करा... त्या पैशाचे गावात एखादे वाचनालय सुरू करा... गोरगरिबांच्या मुलींच्या लग्नाला आर्थिक हातभार लावा... बौद्ध विहारे, मंदिरे किंवा जिमखाना बांधण्यासाठी पैसा सत्कारणी लावा... तुमची मुले आपोआप नंतर स्वतःच्या पायावर उभे राहतील... आणि भरपूर पैसा व संपत्ती कमावतील आणि तुमचाच आदर्श घेऊन समाज कार्य करत राहतील....

- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी ता.अहमदपूर
जिल्हा लातूर
मो.7498715661

प्रबोधन

गप्पा : व्यर्थ वेळ घालवणे गप्पांचा आश्रय । करी कामचोर

राष्ट्रधर्म हा शब्द विचारवंतांना फार प्रिय आहे. म्हणूनच ते कोणत्याही देशाचा विचार करताना आधी त्या देशाचा राष्ट्रधर्म विचारात घेतात. इंग्लंडचा राष्ट्रधर्म आहे परंपरानिष्ठा. अमेरिकेचा राष्ट्रधर्म आहे व्यक्तिस्वातंत्र्य. जपानचा राष्ट्रधर्म आहे उद्योगप्रियता. फ्रान्सचा राष्ट्रधर्म आहे कलाप्रेम. मग भारतीयांचा राष्ट्रधर्म कोणता? या प्रश्नाचं उत्तर विचारवंतांनाही थोडं डोकं खाजवायला लावणारं आहे. पण ज्यांनी आधीच विचार करून ठेवला आहे, ते पटकन सांगतील, 'भारताचा राष्ट्रधर्म आहे गप्पा मारणं!' स्पर्धा लावली तर गप्पा मारण्याचं अजिंक्यपद भारत पटकावल्याशिवाय राहाणार नाही. पुराव्यासाठी एक उदाहरण घ्यायला हरकत नाही. एकदा समाजवादी नेते जयप्रकाश नारायण यांच्याकडे एक जपानी उद्योगपती भारतीय उद्योगांच्या अभ्यासासाठी आले होते. जेपींनी त्यांना एक कारखाना दाखवण्यासाठी नेलं. जाताना काही लोकं एका झाडाखाली गप्पा मारत बसलेले पाहून जपानी उद्योगपतीने जेपींना 'हे लोक असे बसून काय करताहेत,' असा प्रश्न केला. जेपीम्हणाले, 'ही त्यांची न्याहरीची वेळ आहे म्हणून ते बसलेत!' कारखान्याचा अभ्यास दोन तासांनी संपला. उद्योगपती जेपींसह परत येत होते. त्यांनी पाहिलं; ती १०-१२ माणसं पूवीर्सारखीच गप्पात अगदी रंगली होती. त्या उद्योगपतीने जेपींना पुन्हा विचारलं, 'आता ही माणसं काय करताहेत?' खजील झालेले जेपीतो प्रश्न न ऐकल्या- सारखा करून पुढे गेले. जेपींना उत्तरच द्यावं लागलं असतं तर ते 'ही माज्या देशाची माणसं आपल्या प्रिय राष्ट्रधमार्च पालन करीत आहेत,' असं म्हणाले असते.

भारताच्या अवनतीची कारणं सांगताना स्वामी विवेकानंद एके ठिकाणी म्हणतात, 'आपण पोपटाप्रमाणे पुष्कळ गोष्टी बोलतो, पण त्या प्रत्यक्ष करीत नाही. केवळ बोलणं व काहीच न करणं ही आपली सवयच होऊन बसली आहे. याचं कारण शारीरिक दौर्बल्य हेच आहे. दुर्बल मेंदू काहीच करू शकत नाही; आपण तो बलवान केला पाहिजे. '

भारताच्या धडाकेबाज माजी प्रधानमंत्री दिवंगत इंदिरा गांधी यांनी काम ज्यादा, बातें कम! अशी एक घोषणा संदेश म्हणून राष्ट्राला दिली होती. तरीही त्यांची दुसरी एक गरिबी हटाव ही घोषणा राष्ट्रीय पातळीवर नेत्यांच्या आवडत्या गप्पांच्या रूपातच राहिली.

शिक्षणात मूलभूत बदल करण्याच्या गप्पा शिक्षणमंत्र्यांपासून शाळेतील शिपायांपर्यंत सारेच तावातावाने मारतात. दहा-पाच वर्षांतून शिक्षणात आमूलाग्र बदल झाल्याचं बोललं-लिहिलं जातं. पण पाहावं तर गाडं असतं तिथेच असतं. कारण बदलांच्या फक्त गप्पाच मारायच्या, हा आपला राष्ट्रधर्म !

'आमच्या समाजाला भट आणि पुराणिक गप्पा मारून वेड लावतात,' असा आरोप करताना लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख म्हणतात, 'पुराणिक व्रत सांगू लागला की, त्याच्या पुढे अडाणी बायका व चार मूर्ख पुरुष बसलेले असतात. त्यांच्यात व जनावरात काही फरक नसतो. याजमुळे जे पुराणिक सांगतो ते त्यास खरे वाटते आणि पुराणिक म्हणतो दोन हजार वाती करून देवापुढे जाळल्या असता महापुण्य आहे. मग त्या बायका तसेच करतात. '

पुराणिकांच्या गप्पांपेक्षा ज्योतिष्यांच्या गप्पा आणखी सरस असतात. शनिपीडा, कडक मंगळ, कालसर्प योग अशा गप्पा मारून जगप्रसिद्ध खेळाडूंची इज्जत एका क्षणात लुटणारे ज्योतिषी धन्यच म्हणायचे!

रामायण आणि महाभारत ही महाकाव्यं म्हणजे गप्पांची पेवेच आहेत. दहातोंडी रावण, आकाशगामी मारुती, हाडांच्या भस्मातून जिवंत होणारा कच, भुंग्याला मांडी पोखरू देणारा कर्ण, गंगेचा पुत्र भीष्म-साऱ्या गप्पाच गप्पा. महाकाव्यांचं राहू दे, आजच्या इंग्रजी पेपरात समीक्षा करणारे मोनालिसाचे हास्य हा 'आत्मिक समाधान' देणारा प्रकार आहे, अशा पोकळ गप्पा मारून प्रतिष्ठित पत्रकाला रद्दीचं रूप आणतात. नव्या संगणक युगाला आपण जुन्या गप्पांचा बराच कचरा रोजच पुरवत आहोत. कारण गप्पा हा आपला राष्ट्रधर्म आहे. तो असा आहे-

वेद जेव्हा गातो । ईश्वराचे गीत
गप्पांची प्रभात । तेव्हा होई ॥१
पुराणांच्या कथा । गप्पांचा पाऊस
भिजण्याची हौस । भक्ता फार ॥ २
गप्पषीर्चा बाप । कीर्तन करतो
थापाच मारतो । नाचूनिया ॥ ३
बुवा, बापू, माता । थापाड्यांची टोळी
भाविकाचे बळी । घेती सदा ॥४
नेत्याच्या गप्पात । असे महाशून्य
न्यून ते न पूर्ण । कधी होई ॥५
गप्पांचा आश्रय । करी कामचोर
'तरीही मी थोर' । भासवाया ॥ ६
धर्मगुरू गप्पा । शिवाय बोलेना
सत्य सापडेना । कणभर ॥७
गप्पांच्या सागरी । लोक हे बुडती
प्रबोधना हाती। वाचतील ॥८

प्रा. डॉ. जे. बी. शिंदे
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

पालखी मार्गाला जोडणाऱ्या रस्त्याच्या कामांसाठी 1 कोटी 5 लाख रुपयांचा निधी- राम सातपुते

माळशिरस (कटूसत्य वृत्त):- माळशिरस तालुक्यातील पालखी महामागार्ला जोडणा-या रस्त्याच्या कामांसाठी ह्लब गटह्व योजने मधून सुमारे 1 कोटी 5 लाख रुपयाचा निधी राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मंजूर केल्याने वारीला येणा-या ग्रामीण नागरिकांचा मार्ग सुकर व सुरक्षित होणार असल्याची माहिती राम सातपुते यांनी दिली. मांडवे येथील नातेपुते जुना पालखी रस्ता दुरुस्ती कामाचे उद्घाटन राम सातपुते यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी हस्ते करण्यात आले.

यावेळी ते बोलत होते.

यामध्ये माळशिरस तालुक्यात ह्लब गटह्व योजने मधून पवारवाडी गुरसाळे मुजवाडी रस्ता विशेष दुरुस्ती करणे 30 लाख रुपये,तोंडले दसुर रस्ता दुरुस्ती 10 लाख रुपये,मांडवे ते नातेपुते जुना पालखी रस्ता दुरुस्ती 30 लाख रुपये,निमगाव बनकरमळा रस्ता दुरुस्ती 25 लाख रुपये निधी,सदाशिवनगर ते मांडवे रस्ता 10 लाख रुपये असे एकूण 1 कोटी 5 लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.

या रस्त्यांच्या कामांसाठी आपण केलेल्या पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद देत राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मंजूर केलेल्या निधीद्वारे हे काम करण्यात येत आहे. असेही यावेळी राम सातपुते यांनी सांगितले.

नोंदणी व मुद्रांक विभागाची पुणे येथे एक दिवशीय कार्यशाळा संपन्न

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- नोंदणी व मुद्रांक विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने नोंदणी विधेयक मसुदा 2025 वर सुधारणा सुचवण्यासाठी पुणे येथे एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य रवींद्र बिनवडे (क्अर) यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. यावेळी राज्यातील सर्व नोंदणी व मुद्रांक उपविभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी, विशेषतः नोंदणी उपमहानिरीक्षक तथा मुद्रांक उपनियंत्रक यांच्या सादरीकरणाने, मसुद्याच्या सर्व कलमांवर अनेक मौलिक सूचना मांडल्या. या सूचनांमुळे हा कायदा अधिक नागरिक केंद्रित, पारदर्शक आणि डिजिटलायझेशनला पूरक होण्यास मदत होईल. या कार्यशाळेला अप्पर मुद्रांक नियंत्रक संजय चव्हाण (क्अर), शासनातर्फे प्रतिनिधी म्हणून अप्पर मुख्य सचिवांचे ओएसडी राजेंद्र मुठे, सहसचिव सत्यनारायण बजाज, तसेच मुद्रांक अधीक्षक अशोक पाटील, नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय) उदयराज चव्हाण यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कार्यशाळेत नोंदणी विधेयक मसुदा 2025 चे सामूहिक वाचन करण्यात आले आणि सर्व विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी सुचवलेल्या सूचना विचारात घेण्यात आल्या.

नोंदणी विधेयक मसुदा 2025 हा नोंदणी कायदा 1908 ला आधुनिक स्वरूपात परिवर्तित करण्याचा प्रयत्न आहे. यामध्ये डिजिटल नोंदणी, आधार आधारित पडताळणी, इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड्स आणि विस्तारित बंधनकारक दस्तऐवज यासारख्या सुधारणा समाविष्ट आहेत. कार्यशाळेत नोंदणी उपमहानिरीक्षक तथा मुद्रांक उपनियंत्रक यांनी सादरीकरणाद्वारे मसुद्याच्या सर्व कलमांवरील तांत्रिक आणि प्रशासकीय पैलूंवर प्रकाश टाकला आणि उपविभागीय स्तरावर समन्वयाची गरज अधोरेखित केली. यावेळी मसुद्याच्या डेटा गोपनीयतेच्या संदर्भात डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट, 2023 च्या तरतुदींचे पालन सुनिश्चित करण्यावर विशेष भर देण्यात आला, ज्यामुळे डेटा संकलन, सुरक्षा आणि तृतीय पक्ष सामायिकरणासाठी कठोर नियम लागू करणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले. यावेळी मांडण्यात आलेल्या प्रमुख सूचनांमध्ये खालील बाबींचा समावेश आहेः डिजिटल समावेशकताः ग्रामीण भागात ऑफलाइन नोंदणी केंद्रे आणि डिजिटल साक्षरता कार्यक्रम राबवणे. डेटा गोपनीयताः डेटा एनक्रिप्शन आणि ऑडिटसाठी कठोर तरतुदी, पारदर्शकताः नोंदणी रद्दीकरण प्रक्रियेत स्पष्टता आणि अनिवार्य नोटीस. विवाद निवारणः स्वतंत्र नोंदणी विवाद निवारण प्राधिकरणाची स्थापना. नोंदणी महानिरीक्षक रवींद्र बिनवडे यांनी समारोपीय भाषणात सांगितले, "राज्यातील सर्व उपविभागीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सूचनांमुळे हा मसुदा अधिक सर्वसमावेशक आणि प्रभावी होईल. डिजिटल इंडियाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे, ज्यामुळे नागरिकांना जलद आणि पारदर्शक सेवा मिळतील." त्यांनी पुढील कालावधीत या सूचनांवर आधारित आणखी चर्चा आयोजित करण्याचे नियोजन असल्याचेही नमूद केले. कार्यशाळेचा समारोप रेसिडेन्सी क्लब, पुणे येथे सायंकाळी संपन्न झाला. या मसुद्याला अंतिम स्वरूप देण्यासाठी पुढील बैठका आणि चर्चा आयोजित करण्यात येणार आहेत. हा कायदा लागू झाल्यास नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ, सुरक्षित आणि आधुनिक होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. अशी माहिती, सह जिल्हा निबंधक वर्ग-1 तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, सोलापूर पी.जी. खोमणे यांनी दिली.

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे अशासकीय पदांची भरती

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे 1 लिपिक टंकलेखक हे अशासकीय पद मेस्को मार्फत भरावयाचे असून सोलापूर जिल्हयातील माजी सैनिक तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांच्या रोजगार पटावर नोंद असलेल्या युध्द विधवा (इं३३ी उं२४'३८) / युध्दजन्य कारणा व्यतिरिक्त दिवंगत झालेल्या (ढँ८३्ू' उं२४'३८) सैनिकाच्या विधवा पत्नी यांना प्राधान्य देण्यात येईल. सदर प्रवगार्तील उमेदवार उपलब्ध न झाल्यास माजी सैनिकांच्या विधवा पत्नी या पदासाठी पात्र ठरतील. या पदाकरीता मराठी टंकलेखनाचा वेग दर मिनिटास किमान 30 शब्द असल्याचे वाणिज्य प्रमाणपत्र तसेच महाराष्ट्र शासनाचे टर उक्ळ प्रमाणपत्र धारण केलेले असावे किंवा मराठी टंकलेखन येणे अनिवार्य राहील. तरी सदर संधीचा सोलापूर जिल्यातील माजी सैनिक / युध्द विधवा/माजी सैनिकांच्या विधवा पत्नी यांनी लाभ घ्यावा. तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांचे अधिपत्याखालील सैनिकी मुलांचे वसतिगृह, सोलापूर येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधनावर पहारेकरी-1 पद भरावयाचे आहे. पहारेकरी पदाचा अनुभव असणा-यांना प्राधान्य देण्यात येईल. मानधन रुपये 20886/- प्रतिमहा असेल, तसेच सदरील पद हे निवासी आहे. पहारेकरी पदासाठी नियुक्त झालेल्या उमेदवाराने रात्रीचा पहारा देणे व मुक्कामी रहाणे आवश्यक आहे. पहारेकरी पद हे माजी सैनिक प्रवगार्तून भरावयाचे आहे. सदर पद भरतीसाठी माजी सैनिक यांना प्राधान्य देण्यात येईल. माजी सैनिक उपलब्ध न झाल्यास नागरी जीवनातील उमेदवारांचा विचार केला जाईल. तरी वरील दोन्ही पदा साठी सोलापूर जिल्हयातील माजी सैनिकांनी आपले अर्ज सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह दिनांक 26 जून 2025 पूर्वी या कार्यालयात सादर करावे. दोन्ही पदाकरिता दिनांक 26 जून 2025 रोजी मुलाखती घेण्यात येतील. आपले अर्ज सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह (मुळ कागदपत्रे व त्यांची छायांकीत प्रती- 2) सादर करावे. तरी सोलापूर जिल्यातील पात्र व गरजू माजी सैनिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार (नि) यांनी केले आहे.

अभिनेञी माधुरी पवार यांचा कौतुकास्पद उपक्रम - दिगंबर काळे

माढा (कटूसत्य वृत्त):- शक्ती बहुउद्देशिय संस्था कोंढवे जि.सातारा यांच्या वतीने जि.प. शाळा मसोबावाडी(उपळाई बु) ता-माढा येथे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रमेश मुळे, संतोष शेंडे व बाबाजी गाडे यांच्या शुभहस्ते मोफत वह्या व शालेय उपयोगी साहित्यांचे वाटप करण्यात आले.शक्ती बहुउद्देशिय संस्था ही गोरगरीब, वंचित, कष्टकरी व गरजू सामाजासाठी नेहमीच मदत करीत आली आहे.शक्ती बहुउद्देशिय संस्थेचा यापुढेही अनेक सामाजिक उपक्रमात सहभाग असेल असे संस्थेच्या संस्थापिका अभिनेञी माधुरी पवार यांनी सांगितले.

दूरध्वनीद्वारे शाळेतील सर्व मुले-मुली यांच्याशी हितगुज केली.पुढील शैक्षणिक वषार्साठी शुभेच्छा दिल्या. अतिशय

संघषार्तून पुढे आलेली अभिनेञी माधुरी पवार यांनी आपल्याला मिळालेल्या मानधनातून संस्थेच्या माध्यमातून वंचित

योगाच्या शास्त्रीय माहितीसाठी मल्टीमिडीया चित्र प्रदर्शन उपयुक्त - पोलीस आयुक्त एम राजकुमार

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- आनंदी आणि आरोग्यमय जिवनासाठी नियमित योगासने करणे आवश्यक आहे. आरोग्य हीच आपली धनसंपदा आहे. आंतरराष्ट्रीय योग दिवस हा आरोग्याची काळजी घेणेचे स्मरण करुन देतो. योगाच्या शास्त्रीय माहितीसाठी केंद्रीय संचार ब्युरोचे मल्टीमिडिया प्रदर्शन अत्यंत उपयुक्त आहे, असे प्रतिपादन पोलीस आयुक्त एम राज कुमार यांनी आज येथे केले.

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्युरो, योग दिवस समन्वय समिती, हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय आणि जिल्हा व पोलिस प्रशासन यांच्यावतीने हरिभाई देवकरण प्रशालेच्या मुळे सभागृहात आयोजित दोन दिवसीय मल्टीमिडिया चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी आयुक्त एम राज कुमार प्रमुख पाहूणे म्हणून बोलत होते.

मंचावर क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव, मुख्याध्यापिका दीपा फाटक, पोलीस निरीक्षक अजित लकडे, पर्यवेक्षक भानुदास बनसोडे, मनमोहन भुतडा, रोहिणी उपळाईकर, बाळासाहेब पाटील, सतीश घोडके, उद्योजक विरेश नसले, प्रभा कोडगे, अक्षय गवळी आणि सारिका अनपट आदी उपस्थित होते.

आयुक्त राज कुमार म्हणाले, योग आता केवळ ऋषी-मुनींपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो एक सार्वत्रिक जीवनशैली बनला आहे. योगाचे फायदे ओळखून, तो मोठ्या प्रमाणावर स्वीकारला जात आहे. यावर्षी आंतरराष्ट्रीय योग दिनाची एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग ही संकल्पना आहे. आपले कुटूंब हे संपूर्ण पृथ्वी आहे. आपण या सगळ्या कुटूंबाची काळजी घेतली पाहिजे. योग आजच्या दिनापुरता मर्यादित न राहता सर्वकाळ निरंतर करावा. असेही आवाहन त्यांनी केले.

केंद्र व राज्य शासनाकडून विविध माध्यमाद्वारे योग विषयक मोठ्या प्रमाणात प्रचार-प्रसार होत असल्यामुळे योगाची माहिती प्रत्येक घराघरात पोहचत आहे. केंद्रीय संचार ब्युरोने मल्टीमिडिया चित्रप्रदर्शनाच्या माध्यमातुन लोकांना आरोग्याबाबत दक्ष केले आहे. त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन सुनिल सोनटक्के यांनी केले.

श्रीमती पाठक म्हणाल्या, शासनाच्या प्रत्येक उपक्रमात हरिभाई देवकरण प्रशालेचा सक्रीय सहभाग असतो. योग गुरु भुतडा आणि रोहिणी उपळाईकर यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

सामान्य लोकांना योगाबद्दल माहिती व्हावी यासाठी मल्टीमिडियाच्या माध्यमातून प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. शहरातील शालेय विदयार्थी महाविदयलयीन युवक व ज्येष्ठ नागरिक यांनी प्रदर्शनाला भेट दयावी. हे प्रदर्शन भारतीय प्राचीन योगाची माहिती देणारे आहे. यामध्ये प्रार्थना, पूरक हालचाली मानेच्या, योगासने उभी, बैठक, पाटीवरील, पोटावरील, प्राणायाम, ध्यान आदीबाबत माहिती मिळणार आहे. हे प्रदर्शन सकाळी 11 ते 5 वाजेपर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहील. याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन अंबादास यादव यांनी प्रास्ताविकेतून केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आले. सूत्रसंचालन आणि आभार प्रमोद चुंगे यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी कार्यालय सहायक जे एम हन्नुरे, जिल्हा माहिती कार्यालयाचे भाऊसाहेब चोरमले, साईराज राउळ, योगीराज कोंडाबत्तीन, पियुष बनसोडे, किरण गवळी आदींनी परिश्रम घेतले.

माकप कडून पद्मश्री मारुती चित्तमपल्ली यांना भावपूर्ण श्रद्धांजली व विनम्र अभिवादन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- ज्येष्ठ साहित्यिक मारुती चित्तमपल्ली यांनी मराठी साहित्यविश्वात एक लाख नव्या शब्दांची जी भर घातली ती भर आजवरच्या मराठी साहित्य विश्वात सर्वात मोठी अभिनव क्रांती समजण्यात यावी. निसर्ग आणि निसगार्शी निगडीत सर्व समावेश घटकांवर सहज आकलन होईल, असे समृद्ध लेखनाचा विक्रम मारुती चित्तमपल्ली यांचा नावे आहे. जल ,जंगल, जमीन ही आदिवासी बांधवांसाठी निसर्गदत्त देणगी आणि वडिलोपार्जित संपत्ती असून त्याचे संवर्धन करणे, त्यांच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आणि आहे. मात्र, यामुळे निसगार्चे समतोल कायम राहील. यासाठी स्वतः वन संवर्धन चळवळीत अव्याहतपणे आजही कृतिशील आहेत. अर्थातच हे अभिनव व अभूतपूर्व विशेष निसर्ग संशोधन त्यांनी केलेला आहे. यांचा गौरव पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात यावा. अशी पहिल्यांदा महामहीम राष्ट्रपती, भारत सरकारकडे यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली होती. नुकतेच त्यांना भारत सरकार मार्फत महामहीम राष्ट्रपतींच्या हस्ते पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आले.ही सोलापूर च्या वैभवात भर टाकणारी भूषणावह बाब आहे.मात्र काल रात्री ते अनंतात विलीन झाले.ही ही अत्यंत दुःख द घटना आहे.त्यांच्या आत्म्याला सद्गती लाभो अशा शब्दांत ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ नरसय्या आडम मास्तर यांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या व तमाम श्रमिकांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण

पद्मश्री मारुती चित्तमपल्ली यांचे कार्य आणि लेखन बाबत नमूद करताना आडम म्हणाले की, मारुती चितमपल्ली यांनी अरण्य आणि त्याभोवताल विणल्या गेलेल्या विश्वातील कितीतरी घटकांना चितमपल्ली यांनी आपल्या शब्दांमध्ये गुंफले आहे. पक्षी असोत की वनस्पती, कितीतरी नवी नावे केवळ त्यांच्यामुळे मराठी साहित्यात नोंदली गेली आहेत. या मूळ तेलुगु भाषिक माणसाने मराठीला सुमारे एक लाख शब्दांचा खजिना उपलब्ध करून दिला आहे.चितमपल्ली यांनी पक्षीशास्त्रातील अनेक संज्ञांचे मराठी नामकरण केले आहे. जसे कावळ्यांच्या वसाहतीला इंग्रजीत रूकरी असा शब्द आहे. चितमपल्लींनी त्यासाठी काकागार हा शब्द योजला. तसेच हेरॉनरी (बगळे, ढोकरी ह्या पक्ष्यांची वीण वसाहत) ला सारंगागार असा समर्पक शब्द मराठीत तयार केला आहे. रूस्टिंग प्लेससाठी रातनिवारा हा शब्द वापरला आहे. टणटणी (घाणेरी) चे रायमुनिआ तर बहाव्याचे अमलताश हे नाव चितमपल्ली यांच्यामुळे नागरी वाचकांस माहित झाले.

यावेळी त्यांच्या राहत्या घरी माकपचे राज्य समिती सदस्य कॉ ॲड अनिल वासम व विरेंद्र पद्मा, बाळकृष्ण मल्याळ, विजय हरसूरे आदींनी पार्थिवाचे दर्शन घेतले.

सोलापूर महानगरपालिका,सोलापूर
रमाई घरकूल आवास योजना (शहर) सोलापूर महानगरपालिका क्षेत्र
जाहिर प्रसिध्दीकरण

रमाई घरकूल आवास योजनेची जाहिरात ही सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवासी यांना लागू राहील. अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकूल (रमाई घरकूल आवास योजना) हि योजना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे मार्फत सोलापूर महानगरपालिकेकडून राबविण्यात येत आहे.

अनुसचित जाती व नवबौध्द व्यक्तींना त्यांच्या बिकट आर्थीक परिस्थितीमुळे स्वतःच्या उत्पन्नातून चांगल्या प्रकारचे पक्के घर बांधणे शक्य होत नाही. शहरामधील वाढत्या किंमतीमुळे येथे स्वतःचे घर घेवू शेत नाही. पर्यायाने त्यांना झोपडपटटीमध्ये रहावे लागते.

ग्रामीण व शहरी भागातील अनुसुचित जाती व नवबौध्द लोकांचे राहणीमान उंचवावे व त्यांच्या निवा-याचा प्रशन सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागामध्ये त्यांच्या स्वतःच्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधणेसाठी रमाई आवास घरकूल योजने अंतर्गत लाभ देण्यात येतो.

१) महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय. क्र. बीसीयच-२००८/प्र.क्र.३६/मावक-२, दि. १५/११/२००८
२) महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.बीसीयच-२००९/प्र.क्र. १५९/मावक-२, दिनांक ०९/०३/२०१०

१) अर्जदाराने सादर करावयाची कागदपत्रे

अ) घरपटटी, पाणीपटटी, विदयुत बिल या कागदपत्रांपैकी एक.
ब) सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत.
क) सक्षम प्रधिकारी यांनी दिलेल्या उत्पन्नाचा दाखला.
ड) जमीन ताबा पत्र पुरावा (७/१२ उतारा/मालमत्ता नोंदणी प्रमाणपत्र) शक्यतो अर्जदाराची स्वतःची जागा असावी अथवा त्याचे स्वतःचे कच्चे घर असलेल्या ठिकाणी घर बांधता येईल.
ई) अतिरिक्त दाखले - १) दि.०१/०१/१९९५ चा मतदार यादीतील नावाचा उतारा २) निवडणूक मतदार ओळखपत्र ३) रेशन कार्ड ४) महानगरपालिका मालमत्ता कर / झोपडपटटी निर्मुलन व पुनर्वसन विभागाकडील कर भरल्याची पावतीची प्रत.

२) पात्रता

अ) महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द संवर्गातील असावा.
ब) महाराष्ट्र राज्यातील वास्तव १५ वर्षाचे असावे
क) अर्जदाराच्या कुटुंबाची वार्षीक उत्पन्न मर्यादा- मनपा क्षेत्राकरिता र.रु.३.०० लाख असेल.
ड) दि. ०१/०१/१९९५ रोजी संरक्षित झोपडीदार म्हणून संरक्षण प्राप्त असलेल्यांचा या योजनेत समावेश करण्यात येईल.
इ) शासनाच्या अन्य कोणत्याही गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
ई) सदर योजनेचा लाभ पक्क्या घरावरील वरचा मजला बांधणेसाठी पात्र राहणार नाही.
ड) अर्जदाराचे याअगोदर पक्के घर असेल तर अर्जदार पात्र राहणार नाही.
ऊ) बांधकाम करते वेळी आवश्यक परवानगी संबंधित क्षेत्रिय कार्यालय व समक्ष प्राधिकारी तथा सहा. संचालक नगर रचना,सोमपा यांचेकडून घेणे आवश्यक आहे.

केवळ कच्चे घर असलेल्यांनीच अर्ज करावेत

रमाई घरकूल आवास योजना (शहर) करिता अर्ज सोलापूर महानगरपालिकेचा रमाई योजना आवास घरकूल निर्माण कक्ष यांचेकडे नमूद मान्य निकषानुसार पात्र असलेल्या अपला परिपूर्ण अर्ज व कागदपत्रे सादर करावीत.

सही/-
आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

कासेगांव येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- सामान्य नागरिकांना महसूल विभागाचे विविध दाखले ग्रामस्तरावर उपलब्ध व्हावेत यासाठी कासेगांव मंडलस्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्ग समाधान शिबीराचे आयोजन यल्लमा देवी मंदीर सभागृह कासेगाव येथे शुक्रवार दिनांक 20 जून 2025 रोजी करण्यात आले असून, कासेगांव मंडलातील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन मंडल अधिकारी पंकज राठोड यांनी केले आहे.

या शिबीरात कासेगाव मंडळातील कासेगाव, गोपाळपूर, अनवली, एकलासपूर, शिरगांव, तरटगाव (का) या गांवातील नागरिकांसाठी महसूल विभागाचे विविध दाखले एकाच ठिकाणी देण्यात येणार आहेत.

पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेस मुदतवाढ

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- प्रधानमंत्री पिक विमा योजने अंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजना अंतर्गत केंद्र सरकार व राज्य सरकार कडून फळ पिक विमा भरण्यास मुदत वाढ देण्यात आली असून. फळपिक विमा भरण्याची अंतिम मुदत 30 जून 2025 पर्यंत वाढविण्यात आली असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली. पेरू, मोसंबी व लिंबू पिकाचा फळपिक विमा भरण्याची अंतिम मुदत 14 जून 2025 पर्यंत होती. परंतु ऑनलाईन पोर्टल वरील काही तांत्रिक अडचणीमुळे सोलापूर जिल्ह्यातून बरेच शेतकरी विमा भरण्यापासून वंचित राहिले आहेत. तरी सोलापूर जिल्हातील सर्व डाळिंब, पेरू, लिंबू, विकू सीताफळ व मोसंबी बाग धारक शेतकऱ्यांनी आपल्या फळ बागेचा विमा नजीकच्या कॉमन सर्विस सेंटर, बँक किंवा आपले सरकार केंद्रास भेट देवून आपली फळबाग विमा संरक्षित करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

सहकार भारती पंढरपूर जिल्हा कार्यकारिणी जाहीर

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाचे संघटक मा. शरदजी जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत व विभाग प्रमुख संतोषजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार भारती पंढरपूर जिल्हा कार्यकारिणी (2025-2027) ची अधिकृत घोषणा करण्यात आली. नवीन कार्यकारिणीत सहकारी साखर कारखाना जिल्हा प्रकोष्टपदी उमेश जी परिचारक यांची तर पंढरपूरातील ख्यातनाम प्रज्ञावंत व्यावसायिक CA राजेंद्र विलास बजाज यांची अध्यक्षपदी, शिवानंद बोरामणी यांची महामंत्रीपदी, तर ॲड. प्रशांत बिचुकले यांची संघटन प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नविन कार्यकारिणीत अनेक उत्साही व कार्यसमर्थ सहकारी कार्यकर्त्यांचा समावेश असून, सहकार क्षेत्रातील नवचैतन्याची सुरुवात झाली आहे. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सहकार गीताने झाली. दुग्ध प्रकोष्ठ प्रदेशप्रमुख उमेश विरधे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत व परिचय करून दिला. त्यांनी सहकार भारतीचे संस्थापक श्रध्येय लक्ष्मणराव इनामदार व सहकार तपस्वी सुधाकरपंत परिचारक यांना अभिवादन करून सहकार भारती या संस्थेच्या 1988 पासूनच्या वाटचालीचे अवलोकन उपस्थितांना दिले. मा. शरदजी जाधव यांनी सहकाराच्या वाढत्या भूमिका, केंद्रीय सहकार मंत्रालय, तसेच 'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया' या उपक्रमांतील सहकार क्षेत्राचे योगदान विषद केले. विविध प्रशिक्षण उपक्रम व उद्योग संधींची माहिती देत सहकार चळवळीचे भविष्य भक्कम असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाला पांडुरंग साखर कारखान्याचे माजी चेअरमन दिनकरभाऊ मोरे, पंढरपूर बँकेचे चेअरमन सतीशराव मुळे, जिल्हा संघचालक डॉ. रमेश सिद, युवक नेते प्रणव परिचारक, करमाळ्याचे कन्हैयालाल देवी, सुरज रोंगे, सहकार भारतीचे भोवाळकर तसेच पंचक्रोशीतील विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सह विभाग प्रमुख नाना वाघमोडे, सूत्रसंचालन विशाल तपकीरे तर कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्याचे नियोजन गणेश हरिदास यांनी केले. कार्यक्रम अत्यंत उत्साही व प्रेरणादायी वातावरणात पार पडला असून नूतन कार्यकारिणीस सहकार क्षेत्रात नवचैतन्याने कार्य करण्यासाठी सकारात्मक ऊर्जा प्राप्त झाली आहे.

जाहीर प्रसिध्दीकरण

सि.कि.अर्ज नं.३०९/२०२५ नि.०६
सोलापूर येथील मे.सिव्हील जज्ज सिनीअर डिव्हीजन यांचे कोर्टात

१) श्रीमती रेश्मा अस्लम चौधरी, वय - ४१ धंदा घरकाम,२) महेक अस्लम चौधरी, वय-२५ वर्षे, धंदा शिक्षण,३) अरमान अस्लम चौधरी, वय- १९ वर्षे, धंदा शिक्षण,४) श्रीमती मुमताज अ. गनी चौधरी, वय ७६ वर्षे, धंदा घरकाम, सर्व रा. मॉडर्न बेकरी जवळ, कालिका देवी चौक पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर } अर्जदार
विरूध्द
कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी तिचे मयत पती अस्ल अ. गनी चौधरी यांचे सेवेतील वेतन व भत्ते आणि अपघात विमा रक्कम रुपये १५,००,०००/- मिळणेकरिता वारसा प्रमाण पत्र मिळणेकरिता या मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना वारसा प्रमाणपत्र देणेकामी कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत किंवा नेमली तारीख ५/८/२०२५ रोजी हजर राहून हरकत घ्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. कोर्ट अर्जदारांचे म्हणणे ऐकून घेऊन योग्य ते आदेश करतील नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहिर नोटीस दिली ता. १८/६/२०२५

लिपीक (शिक्का) सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, सोलापूर,

ग्रामपंचायत मोडनिंब ता.माढा जि.सोलापूर

टेंडर नोटीस

ग्रामपंचायत मोडनिंब,ता.माढा,यांचेकडून खालील कामे करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोट्यात निविदा मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	टेंडर फॉर्म फी	कामाची मुदत	ठेकेदार वर्ग
१)	प्रभाग ४ मध्ये मोहिते वस्ती येथे सौर ड्युअल पंप व आवश्यक ठिकाणी रिबोअर मोटार HDPE मोटार बसविणे.	३,६८,३५२/-	२००/-	६ महिने	सु.बे.अ
२)	आदर्शनगर येथील गजेंद्र ओहोळ ते भारत पाटोळे घर भु.गटार करणे.	२,८६,५००/-	२००/-	६ महिने	सु.बे.अ
३)	गोरेनगर येथील संदीप गाडे ते हनुमंत गवळी घर रस्ता करणे दत्त मंदिर येथे तार कंपाऊंड करणे.	५,३४,०००/-	२००/-	६ महिने	वर्ग सहा व त्यावरील
४)	गोरेवस्ती येथे रोडगे घर ते बापू जाधव रस्ता कॉंक्रीट करणे.	२,२४,३१६/-	२००/-	६ महिने	वर्ग सहा व त्यावरील
५)	पाणीपुरवठा वीज बिल येवती पाणी पट्टी व हायमास्ट दिवे दुरुस्ती करणे.	२,२०,०००/-	२००/-	६ महिने	विद्युत ठेकेदार
६)	कार्यालयात दुरुस्ती रंगरंगोटी,फिटिंग पंखे, LED बल्ब फर्निचर,शौचालय दुरुस्ती.	३,४७,५२०/-	२००/-	६ महिने	विद्युत ठेकेदार
७)	गावामधील हायमास्ट दिवे दुरुस्ती करणे.	१,३३,१५२/-	२००/-	६ महिने	विद्युत ठेकेदार

टीप: १) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि.२०/०६/२०२५ स.१०:०० पासून २) भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दि.२७/०६/२०२५ सायं ५.०० वा पर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय मोडनिंब ३) निविदा उघडणेचा दि.२८/०६/२०२५ रोजी स.१०:०० वाजता ४) निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. ५) निविदा मंजूर,नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.सरपंच यांना राखुन ठेवला आहे.निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून मिळतील व स्वीकारले जातील.

सही/- ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत
मोडनिंब,ता.माढा,जि.सोलापूर

शिक्का

सही/- सरपंच
ग्रामपंचायत मोडनिंब,
ता.माढा,जि.सोलापूर

जिल्हा परिषद कोर्टी शाळेत प्रवेशोत्सव कार्यक्रम

मुख्याध्यापिका परचंडे मॅडम यांच्या मार्गदर्शनात उत्साहात साजरा

कोर्टी (कटूसत्य वृत्त):- दिनांक:१६/६/२०२५ वार- सोमवार रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोर्टी तालुका पंढरपूर येथे प्रवेशोत्सव व नवगतांचे स्वागत हा कार्यक्रम अत्यंत थाटामाटात शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. शशिकला परचंडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरा करण्यात आला. सदर प्रवेशोत्सव कार्यक्रमाचे उदघाटन शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शबाना

अमीर शेख व उपाध्यक्षा सौ. प्रियांका गणेश सकटे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. तसेच क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन ही करण्यात आले.

प्रथमता इयत्ता -पहिली मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची फेटे बांधून रथामध्ये बसवून हातामध्ये फुगे देऊन डॉल्बीच्या साह्याने गावातील मुख्य रस्त्यावरून मिरवणूक काढण्यात आली. तसेच शाळेमध्ये सर्वांच्या उपस्थितीमध्ये सर्व विद्यार्थ्यांना हातात गुलाबाचे फूल, पुस्तके, गणवेश ,बूट- सॉक्स यांचे वाटप करून स्वागत करण्यात आले. तसेच सर्व विद्यार्थ्यांना गोड खाऊ जिलेबी चेही वाटप करण्यात आले. तसेच पंढरपूर तहसीलचे तहसीलदार सचिन लंगुटे साहेब व सरपंच राजाभाऊ पवार यांनी शाळेला भेट देऊन पहिली मध्ये दाखल झालेल्या पटा बद्दल तसेच सर्व वर्गांना भेट देऊन शाळेबद्दल समाधान व्यक्त केले. आणि तहसीलदार साहेबांनी शाळेतील धोकादायक खोल्या लवकरात लवकर पाडण्यासंदर्भात प्रशासनाला सूचना दिल्या. यावेळी तहसीलदार सचिन लंगुटे साहेब यांचा शाळेच्या वतीने सत्कार ही करण्यात आला. यावेळी शाळा समिती सदस्य श्रीनाथ बाबर उपस्थित होते.

यावेळी माजी उपसरपंच महेश येडगे, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब व्होनकडे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य मधुकर सकटे, दिनेश चव्हाण, फरहान मुलाणी, श्रीनाथ बाबर, दत्ता ओव्हाळ, बिरा शिंदे, सामाजिक कार्यकर्ते सुरेश लवटे, राजाभाऊ माळी, पत्रकार राजू बाबर आणि अंगणवाडी सेविका आशा सकटे मॅडम, उषा बाबर मॅडम , मंदा वाघमारे मॅडम आणि अंगणवाडी मदतनीस बाबर ताई, सकटे ताई, शाळेतील शिक्षक अरुण पाटील सर, बापूसाहेब मिसाळ सर, सत्यवान कारंडे सर, अनुराधा बोंदर मॅडम सर्व विद्यार्थ्यांचे पालक, ग्रामस्थ आणि सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा, उपाध्यक्षा, सर्व सदस्य शाळे च्या मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक, अंगणवाडी सेविका- मदतनीस तसेच सर्व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापूसाहेब मिसाळ यांनी केले तर आभार प्रदर्शन सत्यवान कारंडे यांनी मानले.

निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरधे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

कटूसत्य शब्दकोडे



उभे शब्द : १) द्रोणाचार्यांची मूर्ती पाहून धनुर्विद्या शिकणारा २) श्रवणेंद्रिय ३) नशीब (हिंदीत) ४) भत उलट लिहा ५) नकारच्या विरूध्दार्थी ५) पंधरा दुणे ७) हॉस्पिटल ८) वाढदिवसावेळी हा कापतात ९) मुलगी किंवा मुलगा (ग्रामीण भाषेत) १४) मुस्लीम धर्मियांचा पवित्र महिना १५) कळत-नकळत चित्रपटाची नायिका १६) संत-*** माळी १८) पणाला लावलेले सर्वस्व - ** ** ** १९) लक्ष्मीदेवी, श्रीविष्णू पत्नी २१) अस्थिर, लटपटीत २२) साताऱ्याचे खासदार- ****** भोसले २५) पोशाख २८) फुलाची उमलण्यापूर्वीची अवस्था ३०) कावळा ३४) गाड्यांच्या चाकावर रबरापासून बनविलेला बसवितात तो गोलाकार ३५) सुगावा, तपास ३६) अमिताभ, धर्मेंद अभिनीत प्रसिध्द चित्रपट ३७) शिवसेनाप्रमुखांवर आधारित चित्रपट ३८) कालवण, पृथ्वी ४३) आमीर खानचा एक चित्रपट ४४) पंढरीला पायी जाणे ४५) मनुष्य ४६) वर्गातील मुलांची संख्या ४७) पोट (हिंदीत) ४८) दुधापासून बनविलेले घी ५०) उद्या (हिंदीत) ५२) स्वाक्षरी

आडवे शब्द :
१) ग.दि. माडगुळकर यांची प्रसिध्द कविता- ** *** ** *** ** सुरेख, होते कुरूप वेडे पिल्ल तयात एक १०) सोने
११) उजाड, मोकळे १२) वक्र, वाकडे १३) पतीचा भाऊ
१५) मित्र, सोबती १७) निवांत डुलतडुलत चालणे-***गमत
१९) एक अभिनेत्री-*** टंडन २०) पिंपळाप्रमाणे एक वृक्ष २३) जीव (हिंदीत)
२४) आई २५) राजा विक्रम आणि *** याची गोष्ट प्रसिध्द आहे
२६) शरीर (हिंदीत) २७) मीठ (हिंदीत) २९) आंबेडकरांचे नातू-*** आंबेडकर
३१) मृत्यूदेवता ३२) एक म्हण-** फुंकली सोनाराने इकडून तिकडे गेले वारे
३३) जेवणाची तीव्र इच्छा ३४) ही एका हाताने वाजत नाही-** ३५) आदर, सत्कार
३६) तपास ३७) मुंबईलगतचा जिल्हा ३८) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली शिक्षण संस्था ३९) रवा, शिरा
४०) छ. शिवरायांविषयी आक्षेपार्ह लिहिणारा विदेशी लेखक-जेम्स **
४१) सत्वांश, अर्क ४२) तुरूंग (इंग्रजीत) ४४) अमाप, भरपूर ४९) ग्रामस्थ ५१) नाना पाटेकर अभिनीत एक चित्रपट ५३) वायू, वारा ५४) गाव करील ते ** काय करील-एक म्हण

सुडोकु - 280

	1	5	8	3				
		9			5		2	8
4	2	8	1			5		
1			2			4		
				8			5	1
		4	6		3	2		7
5			3			6		
3	7		4	2			1	
			5	6	1	7	3	4

सर्व यंत्रणांनी गर्दी व्यवस्थापन आणि घटना प्रतिसाद प्रणालीचे काटेकोरपणे प्रशिक्षण घ्यावे - मोनिका सिंह ठाकुर

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- पंढरपूर येथे सहा जुलै 2025 रोजी आषाढी यात्रा भरणार आहे आषाढी यात्रा कालावधी हा 26 जून ते 10 जुलै 2025 असा आहे या कालावधीत दहा ते पंधरा लाख वारकरी भाविक पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येतात. त्या अनुषंगाने गर्दीचे व्यवस्थापन आणि घटना प्रतिसाद प्रणालीचे काटेकोरपणे अंमलबजावणी प्रशासन करत असते. या अनुषंगाने सर्व शासकीय यंत्रणांनी आपले प्रशिक्षण पूर्ण करून दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडावी, असे निर्देश अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर यांनी दिले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित गर्दी व्यवस्थापन आणि घटना प्रतिसाद प्रणाली बाबतच्या प्रशिक्षणात अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर मार्गदर्शन करत होत्या. यावेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, छत्तीसगड येथील इमर्जन्सी अधिकारी विशाल वासवानी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या सहाय्यक अधिकारी अर्चना बिसोई यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर पुढे म्हणाल्या की दिनांक 26 जून ते 10 जुलै या कालावधीत आषाढी वारी पंढरपूर येथे होत असून या कालावधीत सुमारे पंधरा लाख भाविक येण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यात या यात्रेचे नियोजन आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत केले जाते. व्यवस्थापनाच्या सुलभतेसाठी तसेच वारकरी भाविकांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने केंद्र शासनाने घटना प्रतिसाद प्रणाली लागू केलेली आहे व जिल्ह्यात ही प्रणाली 2015 पासून राबवली जात असून सर्व संबंधित यंत्रणा प्रमुखांनी व त्यांच्या अधिनस्त अधिकारी कर्मचाऱ्यांनी गर्दी व्यवस्थापन व घटना प्रतिसाद प्रणालीचे अत्यंत बारकाईने प्रशिक्षण पूर्ण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

आषाढी वारी यात्रेतील गर्दीचे व्यवस्थापनाबाबत युनिसेफचे इमर्जन्सी ऑफिसर विशाल वासवानी यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये आषाढी वारीत गर्दीचे व्यवस्थापन अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्था, सुविधा आणि सेवा, आपत्कालीन नियोजन याबरोबरच कोणत्याही व्यवस्थापनातील यशासाठी महत्त्वपूर्ण घटक असलेला संपर्क या अनुषंगाने सविस्तर माहिती दिली. घटना प्रतिसाद प्रणाली आपत्तीजन्य परिस्थिती धोका कमी करण्यासाठी एक प्रभावी यंत्रणा आहे या प्रणालीद्वारे नियोजन सुयोग्य व सुलभ होते त्यासाठी आवश्यक कामकाजाचा लेखाजोगा ठेवणे व त्यानुसार कारवाई करणे अपेक्षित असते असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिशागर ढोले यांनी या प्रशिक्षणाचा उद्देश सांगून आषाढी वारी मध्ये घटना प्रतिसाद प्रणालीचे महत्त्व सांगितले तसेच गर्दीचे व्यवस्थापन करताना या प्रशिक्षणातून खूप काही सर्वांना समजेल असेही त्यांनी सांगितले.

राज्यातील विकास कामांसाठी लागणारे निधी वितरणाची फाईल अर्थ विभागाकडे पाठवू नये! अर्थ विभागांचा अघोषित धक्कादायक नियम

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- राज्यातील सरकारी कामे केलेल्या विकासकांची कंत्राटदार,सुबे अभियंता, मजुर संस्था यांची जवळपास ८० हजार कोटींची देयके गेल्या ९ महिन्यांपासून प्रलंबित आहेत.

मार्च २०२५ मध्ये फक्त यापैकी ३ टक्के निधी उपलब्ध करण्यात आला होता तदनंतर महाराष्ट्र शासनाचे १ महिना बजेट अधिवेशन मुंबई येथे पार पडले सदर बजेट मध्ये सगळ्या विभागांना आर्थिक तरतूद केली आहे व आकडेवारी सहित जाहिर करण्यात आली.

आज जवळपास २० जुन २०२५ आली आहे, नवीन आर्थिक वर्षात ज्या विभागांना भलीमोठी तरतूद करण्यात आली यापैकी नवीन वर्ष सुरू होऊन आज ९० दिवस संपले आहे अजुनही वर्षाचे चार भाग असतात निधी वितरणाचे यात या तिमाहीचे एक छदाम निधी शासनाकडून कोणत्याही विभागास वितरण करण्यात आले नाही आमच्या संघटनेच्या शिष्टमंडळाची सार्वजनिक बांधकाम मंत्री व मुख्यमंत्री यांच्या बरोबर फेब्रुवारी व मार्च २०२५ ला बैठक झाली होती तेव्हा नवीन आर्थिक वर्ष सुरू झाल्याबरोबर एप्रिल ला लगेच निधी उपलब्ध केला जाईल असे आश्वासन दिले होते आज एप्रिल संपुन दोन महिने झाले निधीचा थांगपत्ता कुठेही दिसत नाही.

राज्याचे अनेक विकासाचे केलेल्या कामांचे लेखाशिर्षकाचे फाईल निधी वितरण मंजुरीसाठी अर्थ विभागाकडे पाठविल्या जातात परंतु सध्या गेल्या तीन महिन्यांपासून कोणत्याही विभागाची निधी वितरणाची फाईल मंजुरी साठी अर्थविभागाकडे पाठवु नये असा अघोषित सरकारी फर्मान अर्थविभाग व सरकारनै काढले आहेत असे स्पष्ट दिसत आहे, कारणही तसेच आहे आम्ही कोणत्याही विभागाकडे निधीची चौकशी केली असता संबंधित विभागांचे अधिकारी आमच्या कडे निधीची फाईल आमच्या कडे आले नाही असे उत्तर देतात ,तसेच निधी कधी उपलब्ध होणार आहे असे तीन महिन्यांपासून आम्ही विचारले असता आम्हाला यातील काहीही माहिती नाही आपण अर्थमंत्री व मुख्यमंत्री यांच्या विभागाकडे चौकशी करावी असे सांगितले जाते. आता या प्रत्येक गोष्टीच्या विचारण्यासाठी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री सक्षम उत्तर देतील काय हा प्रश्न पडला आहे.आणि आम्ही तेथे ही चौकशी केली असता तिथेही स्मशान शांतता जाणवते.

जिल्हा नियोजन DPDC फंड, आमदार फंड, Deposit Contrbution works फंड ,सेसफंड, आमदारांचा विशेष निधी ४२१७ फंड, ग्रामविकास २५१५, सार्वजनिक बांधकाम विभागाचे बिल्डिंग मेंटेनन्स २०५९, २२१६ रस्त्याचे दुरुस्ती व खड्डे ३०५४ , ५०५४ सारखे अनेक. लेखाशिर्षकाच्या अंतर्गत केलेल्या ८० हजार कोटींची कामांसाठी निधी कधी उपलब्ध होईल हे कोणीही सांगू शकत नाही तसेच हे मुघली अघोषित अर्थविभागाचे फर्मान या कात्रीत. राज्यातील कंत्राटदार अडकला आहे धक्कादायक माहिती महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना चे राज्य अध्यक्ष इंजि मिलिंद भोसले, महासचिव सुनिल नागराळे कार्याध्यक्ष संजय मैंद,निवास लाड, विभागीय अध्यक्ष सुरेश कडु पाटील, सुबोध सरोदे, अनिल पाटील, प्रकाश पालरेचा, मंगेश आवळे, प्रकाश पांडव, कांतीलाल डुबल, राजेश आसेगावकर, कौशिक देशमुख, अभियंता संघटना महासचिव राजेश देशमुख, कैलास लांडे, नरेंद्र भोसले, राहुल सोनावणे, दिपेश कोतुलवार, प्रशांत कारंडे, सिकंदर डांगे, नितीन लवाळे, अन्वर अली, अश्विन पवार, उद्य पाटील, समीर शेख, सुनिल जाधव यांनी दिली.

पिरळे येथे पंधरा वर्षानंतर एसटी बस सुरू झाल्याने गावकऱ्यांच्या वतीने आनंद

नातेपुते (कटूसत्य वृत्त):- सामाजिक कार्यकर्ते, एन डी एम जे राज्य प्रसिद्ध प्रमुख, जिल्हा दक्षता नियंत्रण समिती व उपविभागीय दक्षता नियंत्रण समिती सदस्य प्रमोद शिंदे यांच्या प्रयत्नाने तब्बल पंधरा वर्षानंतर पिरळे ता.माळशिरस येथे एस टी बस सुरू झाल्याने पिरळे येथील नागरिकांनी आनंद उत्सव साजरा केला.

अनेक वर्षापासून बंद असलेली नातेपुते- पिरळे- बांगार्डे मुक्कामी एस.टी बस पत्रकार प्रमोद शिंदे यांच्या प्रयत्नाने सुरू झाली.सकाळी पावणे सात वाजता बांगार्डे- पिरळे- नातेपुते एस.टी बसचे आगमन होताच पिरळे येथे नागरिकांनी हलगी फटाके वाजवत जल्लोष करत एसटीचे चे स्वागत केले.ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते एस.टी बस चे उद्घाटन करण्यात आले. पिरळे गावचे माजी सरपंच उद्योजक संदीप नरोळे यांनी सर्व नागरिकांना शुभेच्छा देत गावातील २५ प्रवाशांचे स्वतः बसचे तिकीट काढून नातेपुते येथे हॉटेलमध्ये जेवण,चहा,नाश्त्याची सोय केली २५ प्रवाशांनी पहिल्याच दिवशी बस प्रवासाचा आनंद घेतला.नातेपुते एस.टी स्टँडवर प्रसिद्ध उद्योजक प्रमोद शेठ डूडू यांनी प्रत्येक नागरिकांना गुलाबाचे फुल देऊन त्यांचा सत्कार करत एस.टी स्टँड मधील प्रवाशांना पेढे वाटले. ग्रामपंचायत च्या वतीने सरपंच अमोल शिंदे यांनी ग्रामस्थांना पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला तसेच वाहक विजय एकतपुरे,चालक अशोक साळुंखे व पत्रकार प्रमोद शिंदे यांचा फेटा बांधून सत्कार केला.हॉटेलचे मालक मामासाहेब लवटे यांनी सर्व प्रवाशांना मोफत चहा दिला तसेच येणाऱ्या प्रत्येक एस.टी कंडक्टर व ड्रायव्हर यांना मोफत चहा नाश्त्याची सोय कायमस्वरूपी केली आहे. अजिंक्य हेअर स्टाईल चे मालक अजिंक्य भारत खंडागळे यांनी चालक व वाहक यांची कायमस्वरूपी मोफत कटिंग दाढी करून देण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी, उत्तम कदम सर, प्रमोद शिंदे यांनी प्रवाशांना शुभेच्छा दिल्या व नातेपुते- वालचंदनगर बस पिरळे मार्गे जाण्याची मागणी केली आहे जेणेकरून विद्यार्थी, विद्यार्थिनी, महिला व ज्येष्ठ नागरिकांची सोय होईल. याप्रसंगी सरपंच अमोल शिंदे, ज्ञानदेव शिंदे, संदीप नरोळे,तानाजी दडस, नारायण वाघमोडे, महादेव होळकर, भारत पवार, दत्तात्रेय लवटे, दादासाहेब ठवरे, गोरख साळवे, सचिन किर्दक, बाळासाहेब शिंदे, कांतीलाल माने, सुदाम बुधावले, बाबासाहेब खंडागळे, हनुमंत बुधावले, सचिन खिलारे, महादेव रणदिवे, गणपत बुधावले, अनिल वाघमोडे,धनंजय साळवे, संग्राम खिलारे, शंकर साळवे, महादेव बल्लाळ, चव्हाण सिस्टर, अनिल खिलारे, महादेव किर्दक, सुभाष किर्दक, हरिभाऊ लवटे, रघुनाथ दडस, श्रीराम खंडागळे,प्रती कांबळे, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. एसटी सुरू होण्या संदर्भात अकलूज आगार प्रमुख प्रमोद शिंदे व नातेपुते कंट्रोलर राजेंद्र पवार यांनी विशेष सहकार्य केले.

विठ्ठलराव शिंदे कारखान्याच्या पिंपळनेर व करकंब युनिटचे मील रोलर पुजन संपन्न

टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना लि., या कारखान्याचे युनिट नं.1 पिंपळनेर व युनिट नं.2 करंकब या कारखान्याचे पुढील ऊस गाळप हंगाम 2025-26 ची पुर्वतयारी सुरू असून या कारखान्याचे युनिट नं.1 पिंपळनेर येथील मील रोलर पुजन माढा पंचायत समितीचे मा.सभापती तथा संचालक विक्रमसिंह शिंदे यांच्या शुभहस्ते व युनिट नं.2 करकंब येथील मील रोलर व्हाईस चेअरमन वामनराव उबाळे यांच्या शुभहस्ते दि.19/06/2025 रोजी कारखाना कार्यस्थळावर संपन्न झाले.

कारखान्याचे संस्थापक चेअरमन मा.आ.बबनराव शिंदे हे आजारपणातून लवकर बरे होऊन पुन्हा एकदा त्याच ताकदीने जनतेच्या सेवेत सक्रिय व्हावे यासाठी मील रोलर पुजन प्रसंगी उपस्थित सर्व मा.संचालक सदस्य व दोन्ही युनिटचे कारखाना अधिकारी/कर्मचारी यांनी श्री गणेशाची आरती करून देवाला साकडे घालून ईश्वराकडे प्रार्थना केली. सदरप्रसंगी कारखान्याचे संचालक निळकंठ पाटील, वेताळ जाधव,शिवाजी डोके, लक्ष्मण खुपसे, लाला मोरे, पांडूरंग घाडगे, सुरेश बागल, सचिन देशमुख, संदीप पाटील, पोपट चव्हाण, तज्ञ संचालक भरत चंदनकर, अशोक मिस्कीन कार्यकारी संचालक एस.एन.डिग्रजे, युनिट 2 चे जनरल मॅनेजर पी.एस.येलपले, फायनान्स मॅनेजर डी.डी.लव्हटे, केन मॅनेजर एस.पी.थिटे, चिफ इंजिनिअर एस.डी.कैचे, डिस्टीलरी मॅनेजर पी.व्ही.बागल,चिफ केमिस्ट ए.के.जगताप, सिव्हील इंजिनिअर एस.आर.शिंदे, हेड टाईम किपर आर.एन.आतार, युनिट 2 चे चिफ इंजिनिअर एस.एस.महामुनी, चिफ केमिस्ट बी.जे साळुंखे, मुख्य शेतकी अधिकारी आर.जे.पाटील, शेतकी अधिकारी बी.डी. इंगवले, असि. परचेस ऑफिसर एस.व्ही चौगुले, हेड टाईम किपर टी.ए.लोंढे, कामगार प्रतिनिधी अनिल वीर व इतर मान्यवर उपस्थित होते.

सदर प्रसंगी अधिक माहीती देताना माढा पंचायत समितीचे सभापती तथा संचालक विक्रमसिंह शिंदे म्हणाले की, कारखान्याचे संस्थापक चेअरमन आ.बबनराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याची यशस्वी घोडदौड सुरू असून प्रति हंगामामध्ये विक्रमी गाळप होत आहे. ऊस गाळप हंगाम 2025-26 साठी विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे युनिट नं.1 पिंपळनेर येथे 20 लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ठ निश्चित केले असून आजअखेर 31 हजार 463 हेक्टरची ऊस नोंद झालेली आहे. तसेच युनिट नं.2 करकंब येथे आजअखेर 9 हजार 151 हेक्टरची ऊस नोंद झालेली असून 6 लाख मे.टन ऊस गाळपाचे उद्दिष्ठ निश्चित केले आहे. दोन्ही युनिटचे मिळून 26 लाख मे.टन गाळप होईल असे अपेक्षीत असल्याचे त्यांनी सांगितले.

ऊस गाळप हंगाम 2025-26 मध्ये दोन्ही युनिटकडे गाळप क्षमतेएवढा ऊस पुरवठा होण्याचे दृष्टीने आवश्यक ऊस तोडणी वाहतूकीचे करार करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. तसेच करार करणेत आलेल्या ट्रक/ट्रॅक्टर्स, बैलगाडी व ट्रॅक्टर टायरगाडीचे यंत्रणेस कारखाना धोरणा प्रमाणे तीन लाख रुपए प्रमाणे पहिला ॲडव्हान्स हप्ता अदा केलेला आहे. आवश्यकतेनुसार यंत्रणेचे करार लवकरच पुर्ण होत असून ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार व मुकादम यांनी कारखान्याचे शेती विभागाशी संपर्क करून करार करावेत. आ.बबनराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ऑफ सिझन मधील कामे प्रगतीपथावर असून दोन्ही युनिटकडील सर्व कामे वेळेत पूर्ण करून गाळप हंगाम 2025-26 शासनाचे धोरणानुसार वेळेत सुरू करणार आहे. तसेच पुढील हंगाम यशस्वीरित्या पार पाडणेसाठी सभासद व ऊस पुरवठादार शेतक-यांनी जास्तीत जास्त ऊस नोंदी कारखान्याकडे देवून हंगाम यशस्वी करणेसाठी सहकार्य करावे असे आवाहन व्हाईस चेअरमन वामनराव उबाळे व संचालक विक्रमसिंह शिंदे यांनी केले.

मानाच्या दहा पालख्यांतील भाविकांना '108'च्या 100 रुग्णवाहिका देणार सेवा

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- आषाढीवारी साठी पालखी सोहळ्यासोबत पायी चालत येणाऱ्या वारकरी भाविकांसाठी शासनाचा १०८ अत्यावश्यक वैद्यकीय सेवा विभाग व राज्य आरोग्य विभाग यांनी संयुक्तपणे यंदा वारीसाठी मोठ्या प्रमाणात आरोग्य सेवा उभारली आहे. यावर्षी प्रथमच १० मानाच्या पालखी सोहळ्यांसोबत १०० पेक्षा अधिक रुग्णवाहिका सज्ज करण्यात आल्या आहेत. काही रुग्णवाहिका कार्डियाक (हृदयविकार ग्रस्तांसाठी) सुविधा असलेल्या रुग्णवाहिकांचा यात समावेश आहे.

यंदा आषाढी वारीमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक रुग्णवाहिकेत एक डॉक्टर व चालक सज्ज राहणार असून, त्यांच्याजवळ अत्यावश्यक औषधाचा मुबलक साठा उपलब्ध राहणार आहे देहू ते पंढरपूर (जगद्गुरु संत तुकाराम महाराज), आळंदी ते पंढरपूर (संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज), सासवड ते पंढरपूर (संत श्री सोपानकाका महाराज) आणि इतर सात मानाच्या पालख्यांबरोबर १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करण्यात आल्या असल्याची माहिती सोलापूर जिल्हा व्यवस्थापक डॉ. अनिल काळे यांनी दिली

तसेच आरोग्य विभागाने यावर्षी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवीत 'समारिटन' नावाचे मोबाइल ॲप्लिकेशन सुरू केले आहे. या ॲपच्या माध्यमातून वारकऱ्यांना आपत्कालीन वैद्यकीय मदतीसाठी त्वरित संपर्क साधता येणार आहे. ॲपवर आलेल्या माहितीवरून रुग्णवाहिका चालकाला रुग्णाचे ठिकाण अचूक कळणार. यामुळे वारीतील रुग्णांना वेळेवर वैद्यकीय मदत मिळून रुग्णाच्या जीवितास धोका कमी होण्यास मदत होणार आहे. 'समारिटन' हे ॲप शासनाच्या आरोग्य विभाग आणि एसपीईआरओ या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने विकसित करण्यात आले आहे. ॲपल स्टोअर आणि गुगल प्ले स्टोअरवरून ते मोफत डाउनलोड करता येते. या ॲपमुळे केवळ रुग्णवाहिकेशी संपर्कच साधता येणार नाही, तर प्राथमिक उपचाराची माहितीही यामध्ये दिली आहे. त्यामुळे रुग्णवाहिका पोहोचण्यापूर्वी रुग्णाला काही आवश्यक मदत दिली जाऊ शकते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने व 108 चे मुख्य अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर शेळके यांच्या मार्गदर्शनाखली जिल्ह्यात वारकरी -भाविकांना पालखी मार्ग, तळांवर तसेच पंढरपूर शहरात आरोग्य सुविधा देण्यात येणार असल्याचेही डॉ. काळे यांनी सांगितले.

रुकमाई सभागृह पोलीस संकुल, पंढरपूर येथे 'समारिटन' मोबाईल ॲप तसेच कार्डिओपल्मोनरी रिसक्सटिशन (सीपीआर) या बाबतचे प्रशिक्षण पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात आले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, पोलीस निरिक्षक विश्वजीत घोडके, पुणे जिल्हा व्यवस्थापक डॉ. प्रियांक जावळे, प्रशिक्षक डॉ. साक्षी पोटदुखे, डॉ.वैभव भिंगारे, 108 चे सहा.व्यवस्थापक सुनिल चव्हाण, दिलीप शिंदे तसेच पोलीस अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

अनुसूचित जाती - जमातीतील शेतकऱ्यांनी विविध घटकाच्या अनुदानासाठी अर्ज करावे

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान सन 2025-26 या आर्थिक वर्षासाठी सोलापूर जिल्हयास अनुसूचित जाती रक्कम रु. 130.16 लाख व अनुसूचित जमाती रक्कम रु. 38.10 लाख कार्यक्रम राबविण्यास मान्यता मिळालेली आहे. सदर योजनेंतर्गत घटक ड्रॅगन फ्रूट, ॲव्होकॅडो, सुटटी फुले, मसाला पिक, मानांकन रोपवाटीका स्थापन करणे, स्ट्रॉबेरी, हरितगृह, शेडनेट हाऊस, प्लास्टिक मल्चिंग, मधुमक्षिक वसाहत, ट्रॅक्टर पावर टिलर 8 एचपी पेक्षा जास्त, फार्मगेट पॅक हाऊस, प्राथमिक प्रक्रिया केंद्र, एकात्मिक शीतसाखळी, कांदाचाळ, सामुहिक शेततळे, शेततळे अस्तरीकरण इत्यादी. तसेच औषधी व सुगंधी वनस्पती लागवड अंतर्गत औषधी वनस्पती मुलेठी, शतावरी, कालीहारी, सफेद मुसळी, गुग्गुळ, मंजिष्ठा, कुटकी, आतीस, जटामांसी, अश्वगंधा, ब्राम्ही, तुळशी, विदारिकंद, पिवळी, चिराट व पुष्करमुळ . महाग औषधी सुगंधी वनस्पती गुलाब, रोझमेरी, निशिगंध, जीरेनियम, कॅमोमाईल, चंदन, दावना, जाई, लॅव्हेंडर इ. इतर सुगंधी वनस्पती पामरोसा, गवती चहा, तुळस, व्हेटिव्हर, जावा, सिट्रोनेला, गोड तुळशीपत्र, इत्यादी घटकांचा समावेश आहे.

तरी जिल्हयातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील सर्व शेतक-यांना आवाहन करण्यात येते की, वरीलप्रमाणे घटकाचा लाभ घेण्यासाठी अधिकाधिक शेतक-यांनी महाडीबीटी पोर्टल https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी संबंधीत नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सोलापूर शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

लाभार्थी निवडीचे निकष -लाभार्थी शेतक-यांच्या नावे स्वतःची शेत जमिन असणे आवश्यक आहे. शेतकरीकडे फलोत्पादन (फळे, भाजीपाला, फुले व इतर इ.) पिके असणे आवश्यक आहे.

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः सोलापूर येथील लोकांना या जाहीर नोटीसाद्वारे कळवण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- डी व सब डी सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर येथील महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे नेहरूनगर येथील मिळकतीचा जुना सर्वे नंबर ३८४/१ क, यासी नवीन सर्वे नंबर ५/१ क, असून यात बांधलेल्या कुबेर चेंबर्स अँड रेसिडेन्सी, एग -१ विंग या अपार्टमेंट ओनरशिप इमारत मधील बेसमेंट मधील गोडाऊन नंबर बी-३८ याचे बिल्टअप क्षेत्रफळ २३.७६ चौ. मी. किंवा २५५.६८ चौरस मीटर असून यांसी चीतू: सीमा येणेप्रमाणे- पूर्वेस - गोडाऊन नंबर ३७, पश्चिमेस - गोडाऊन नंबर ३९, दक्षिणेस- सदर इमारत मधील अन्य मिळकत, उत्तरेस- प्यासेज येणेप्रमाणे चतु:सीमेतील गोडाऊन जागा अर्जुन उत्तम जाधव यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. सदरहून मालकांनी त्यात असणाऱ्या तंगभूत वस्तुस लाईट कनेक्शन लाईट मीटरस तसेच वाडीच्या हक्काचे आणि सदर आपारमेंटच्या घोषणापत्र नमूद सर्व सामायिक सोयी सुविधांसह सदरहून मिळकत ही आमचे अशील नटराज सिद्राम कांबळे यांना कायम खुषखरेदीने देण्याचे ठरवले आहे. तसेच सदरहून मालकांनी सदरहू गोडवान हे निर्वेध व निजोखमी असल्याचे आम्ही व खात्री आमचे अशिलांना दिलेले आहे. तरी परंतु सदर गोडाऊन जागेवर अन्य कोणाचा हक्क दावा, लीज, गहाण, दान, बक्षीस, पोटगी, खरेदी विक्री, मृत्युपत्र, आग्रह कर्ज व इतर स्वरूपाचे तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांच्या आत आपल्या हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदपत्रे पुराव्यानिशी खालील पत्त्यावर आणून देऊन खात्री करून घ्यावी जर मुदतील कोणाचाही हरकत न आल्यास सदर गोडाऊन जागा ही निर्वेध व निजोखमी आहेत असे समजून आमचे अशील हे सदर गोडाऊन जागा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील नंतर कोणाचाही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही कोणाचाही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली आहे. दिनांक

अशीला तर्फे ऍडव्होकेट
B.Sc. L.L.B. M.B.-
ऍड युवराज जनार्दन आवताडे.
१७७ सिद्धनाथ रामलिंग सोसायटी
इंदिरानगर विजापूर रोड सोलापूर
मो. ७९७२९४२१९६

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
देखभाल दुरुस्ती कक्ष,
जिल्हा परिषद सोलापूर.

निविदा सुचना क्र.०१ सन २०२५-२०२६

मा.कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सोलापूर हे मौजे भोसे व ३९ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता.मंगळवेढाच्या पाणी उपसा केंद्र येथिल ट्रान्सफॉर्मर दुरूस्त करणेबाबत अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणाऱ्या ठेकेदारांकडुन सन २०२५-२६ साठी नमुद केलेल्या कामाच्या सिलबंद निविदा दोन लिफाफा पदधतीने मागवित आहेत. को-या निविदा व अटी व शर्तींचा नमुना उपअभियंता (यांत्रिकी), देखभाल दुरूस्ती कक्ष, जिल्हा परिषद सोलापुर यांचेकडून दिनांक :- २०/०६/२०२५ ते २६/०६/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत देण्यात येतील व दिनांक :- २७/०६/२०२५ रोजी दुपारी १४.०० पर्यंत स्विकारल्या जातील व शक्यतो त्याच दिवशी समोर हजर असणा-या कंत्राटदारांसमोर उघडण्यात येतील.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	बयाणा रक्कम	निविदा फॉर्म फि	काम पुर्ण करण्याचा कालावधी
१)	२)	३)	४)	५)	६)
१)	मौजे भोसे व ३९ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता. मंगळवेढाच्या पाणी उपसा केंद्र येथिल ट्रान्सफॉर्मर दुरूस्त करणेबाबत	८३३२१४/-	८५००/-	५००/-	३० दिवस

१. निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी, एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.
२. को-या निविदा पोष्टाने मिळणार नाहीत.

सही/-
उप अभियंता (यांत्रिकी)
देखभाल दुरुस्तीकक्ष
जिल्हा परिषद सोलापूर

सही/-
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद सोलापूर